# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 8 | Marathi Monthly | Thane, 1 February - 2024 to 29 February - 2024 | Pages 16 | Price : 10/-


# रावणराज्यात राममंदिर..... कलियुगाचा अगाध महिमा...!!!

...आपण भारतीय कधिही रामाचा, 'श्रीराम' असा उल्लेख करत नव्हतो. जसा, आम्ही मराठी लोकं, शिवछत्रपतींचा उत्कट प्रेमाने 'शिवाजी' असा एकेरी उल्लेख करायचो किंवा करतो...तसाच, रामाचा सरळ सरळ उल्लेख, एकतर 'राम' म्हणून आपण करायचो... किंवा, बऱ्याचदा व्यवहारात रामाचा जयजयकार करताना, सीतेसह रामाचा 'जय सियाराम' किंवा 'जय सीताराम' असा संयुक्त-उल्लेख करायचो (खरंतर, रामाचा जयजयकार करताना तसंच, संबोधन आग्रहपूर्वक वापरलं पाहीजे). शिवछत्रपतींचा जयजयकार करताना आजही आम्ही 'जय शिवाजी' म्हणतो किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयजयकार करताना 'जय भीम' म्हणतो. ते आणि तेच, ते आणि तसंच, योग्य संबोधन होय!

मुळातूनच, 'जय श्रीराम' ही खास, संघ-भाजपाई बनावटीची घोषणाच बोगस, फसवी आहे...रामाच्या मूळ वत्सल, न्यायी-प्रेमळ प्रकृतीला पूर्णतः विसंगत व राम-प्रतिमेला निर्गल-बेछूट छेद देणारी आहे. रामाला उग्र-रागीट स्वरुपात पेश करुन आमच्या हृदयातल्या-अंतःकरणातल्या रामाला, ती 'बदनाम' करणारी आहे!

...पण, 'रामाची भाजपकृत बदनामी', इथेच थांबत नाही. त्यासाठी, रामाची एकूणच 'गुणवैशिष्ट्ये' आणि 'जय श्रीराम' घोषणा प्रसवणाऱ्या व पसरवणाऱ्या करंट्यांची 'अवलक्षणं' ढोबळमानाने बघूया....

**राम, एकवचनी होता; एवढंच नव्हे तर, आपल्या पित्याचंही वचन मोडू नये म्हणून १४ वर्षांचा खडतर वनवास पत्करणारा होता... तर, ही भाजपाई लोकं, १५ लाख रु. आपल्या प्रत्येकाच्या खात्यात टाकण्यापासून दरवर्षी २ करोड रोजगार निर्माण करण्यापर्यंतच्या असंख्य भूलथापा (त्यांच्या भाषेत 'जुमला' म्हणजेच...असं वचन, असा वादा, जो प्रत्यक्षात कधिच पुरा करायचा नसतो) देणारी आणि थापाड्यांचा 'विश्वगुरु'ही यांचाच!...** *(पान क्र. ४ वर)*

**इटलीचा क्रूरकर्मा मुसोलिनीची 'काळी टोपी' घालणाऱ्या आणि लाखो-करोडोंना यमसदनी पाठवणाऱ्या जर्मनीच्या नृशंस-नराधम हिटलरला आदर्श मानणाऱ्यांच्या नादाने... भारतातली तथाकथित हिंदुत्ववादी तरुणाई, हातात भगवे झेंडे नाचवत-थिरकत 'जय श्रीराम' अशा, इतरेधर्मीयांना धमकावणीच्या सुरातल्या आरोळ्या देताना दिसतेय...तेव्हा, एक गोष्ट निश्चित होते, ती म्हणजे, डेमॉक्रॅटिक (लोकशाहीप्रधान) भारताची, थिऑक्रॅटिक (धर्मप्रधान) पाकिस्तानच्या दिशेने अधोगती सुरु झालीय...म्हणजे, पाकिस्तानचा द्वेष करता करता, आपण त्या पाकिस्तानच्याच मार्गाने चाललोयत!**

**'जय श्रीराम' ही खास, संघ-भाजपाई बनावटीची घोषणाच बोगस, फसवी आहे...रामाच्या मूळ वत्सल, न्यायी-प्रेमळ प्रकृतीला पूर्णतः विसंगत व राम-प्रतिमेला निर्गल-बेछूट छेद देणारी आहे.**


**खरे 'रामभक्त' असाल, तरुणांनो; तर, संघ-भाजपाई लोकांच्या पातकात, असं अर्वाच्य वर्तन करत, आपण आपसूक का सहभागी होऊ इच्छिता, या प्रश्नाचं उत्तर द्या!**




अंतरंग



ठाण्याच्या वाघबीळ कावेसर भागात, ४०० ते ५०० वृक्षांची निर्दयी कत्तल! पृष्ठ क्र. ४



बिल्कीस बानो आणि अयोध्येतलं राममंदिर... ...राजन राजे पृष्ठ क्र. ११



बेफाम जनसंख्या आणि चंगळवादी जीवनशैली रोखणे ...राजन राजे पृष्ठ क्र. १२

गांधी समजून घेताना... ...रुद्रेश सातपुते पृष्ठ क्र. १४

# दिवा ते उरण रेल्वेसेवा सुरु करण्याची ‘धर्मराज्य पक्षा’ची मागणी...

**ठाणे (प्रतिनिधी) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, दि. १२ जानेवारी–२०२४ रोजी, विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटनाचे कार्यक्रम संपन्न झाले. यामध्ये अटलबिहारी वाजपेयी शिवडी–न्हावाशेवा अटल सेतूचे उद्घाटन करुन, ते राष्ट्राला समर्पित करण्यात आले. त्याचबरोबर, खारकोपर–उरण या नवीन डबल लाईनचे तसेच, ठाणे व ऐरोली या स्थानकादरम्यानच्या दिघा गाव या नव्या रेल्वे स्थानकाचे उद्घाटन पार पडले. अटल सेतू आणि खारकोपर ते उरण या रेल्वेमार्गामुळे, ठाणे, मुंबई, नवी मुंबई ही महत्त्वाची मोठी शहरे आता, हाकेच्या अंतरावर येऊन एकमेकांशी जोडली गेली आहेत. दळणवळणाच्या व पर्यटनाच्या दृष्टीकोनातून पाहता, एकप्रकारची ही उत्तम सुविधाजनक ‘कनेक्टिव्हिटी’ असल्याने, वेळ आणि इंधनाची मोठ्याप्रमाणात बचत होणार आहे, ही अतिशय समाधानाची बाब असल्याची प्रतिक्रिया ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने, प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.**




याच पार्श्वभूमीवर, ठाणे आणि कल्याण शहरांकडून अलिबाग–उरण या दिशेला जाणाऱ्या नागरिकांची मोठी संख्या लक्षात घेता, दिवा ते उरण अशी नवीन रेल्वे–सेवा सुरु करण्यात यावी, अशी आग्रही मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे एका लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, **ठाणे शहराचे उपनगर असलेल्या दिवा रेल्वे स्थानकातून उरणपर्यंतचा रेल्वेमार्ग सुरु झाल्यास, मुंबई उपनगर ते बदलापूरपर्यंतच्या प्रवाशांसाठी ते सोयीस्कर ठरेल. तसेच, वसई ते दिवा व दिवा ते नवी मुंबई–पनवेल असा प्रवास करणाऱ्या पालघरपासूनच्या चाकरमान्यांसाठी, ही रेल्वेसेवा अतिशय उपयुक्त अशी ठरू शकेल. ट्रान्सहार्बर मार्गावरील ठाणे ते पनवेल–वाशी अशी रेल्वेसेवा सुरु असली तरी, त्याचा प्रचंड ताण ठाणे रेल्वे स्थानकावर पडत आहे.** हा ताण कमी करण्यासाठीच, दिवा ते उरण अशी रेल्वेसेवा सुरु करण्यात यावी. कर्जत आणि बदलापूरच्या प्रवाशांना नवी मुंबईत जाण्यासाठी, ठाणे स्थानकातून द्राविडी प्राणायाम करीत प्रवास करावा लागतो. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाया जातो. येत्या दोन वर्षांत कर्जत ते पनवेल असा नवीन लोकल रेल्वेमार्ग सुरु होत आहे. परिणामी, **दिवा ते उरण अशी पनवेलमार्गे रेल्वेसेवा सुरु झाल्यास, कर्जत आणि बदलापूरच्या प्रवाशांवर ठाण्यापर्यंत येण्याची वेळ न येता, ते पनवेल स्थानकातून नवी मुंबई किंवा उरण–अलिबाग येथे सहजपणे जाऊ शकतात. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतील. शिवाय दिवा स्थानकातून ही रेल्वेसेवा सुरु झाल्यास, ठाणे रेल्वे स्थानकावरील अतिरिक्त ताण कमी होईल. तरी, याप्रकरणी केंद्रीय रेल्वे प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा आणि दिवा–दिघा–ऐरोली ते पनवेलमार्गे उरण असा नवीन रेल्वेमार्ग सुरु करण्यासाठी, लवकरात लवकर धोरणात्मक पाऊले उचलावीत, अशी आग्रही मागणी नितीन देशपांडे यांनी, अश्विनी वैष्णव आणि रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे.**



‘धर्मराज्य पक्ष’प्रणित, ‘धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघ’अंतर्गत, स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षाचालक मालक संघटना, नौपाडा–कामोठे (ता. पनवेल) यांच्या वतीने, दि. ०४ जानेवारी–२०२४ रोजी, श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ‘धर्मराज्य पक्ष’ आणि ‘धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. कामोठ्यातील एमजीएम हॉस्पिटलच्या परिसरात आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला ‘धर्मराज्य पक्षा’चे पनवेल तालुक्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी, तसेच ‘धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा’च्या अंतर्गत कार्यरत असलेल्या ‘स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षाचालक–मालक संघटने’चे सदस्य आणि पदाधिकारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

यावेळी मा. राजन राजे यांचे शाल–श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी, रिक्षाचालक संघटनेचे अध्यक्ष श्री. मंगेश मुंडकर, उपाध्यक्ष श्री. जितेंद्र परदेशी, खजिनदार श्री. शरद भगत आदी पदाधिकाऱ्यांसह, श्री. रमेश भगत, श्री. प्रकाश भगत, श्री. बाबुराव भगत, श्री. पंढरीनाथ भगत, श्री. भगवान भगत, श्री. संदेश भगत, श्री. दिलीप भगत, श्री. वृषभ गोंधळी, श्री. महेंद्र म्हात्रे, सौ. प्राजक्ता गोवारी आदींसह, ‘धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा’चे कामगार प्रतिनिधी श्री. समीर चव्हाण, ‘धर्मराज्य पक्षा’चे ऐरोली विधानसभा सचिव श्री. सिद्धेश सावंत भोसले, युवा कार्यकर्ते श्री. नितीन उगले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

'सेंटर फॉर फिनान्शियल अकाऊंटॅबिलिटी' या दिल्लीस्थित संशोधन संस्थने, बँकिंग क्षेत्रातील थकीत कर्जे, निर्लेखित कर्जे (राईट-ऑफ) आणि विलफुल डिफाल्टर्स वगैरेची आकडेवारी संग्रहित केली आहे.

गेल्या दहा वर्षांत, सार्वजनिक/खाजगी बँकांनी मिळून, निर्लेखित केलेल्या कर्जाची रक्कम : १४, ५६,००० कोटी रुपये,

अर्थात यातील ८५% वाटा सार्वजनिक मालकीच्या बँकांचा आहे. एकट्या स्टेट बँकेने दहा वर्षांत ३ लाख कोटी निर्लेखीत केले आहेत...

यातील फक्त २०२२-२३ या वित्तवर्षात २,१२,००० लाख कोटी रुपये निर्लेखित केले गेले.

ज्या वर्षात रोजगार हमी योजनेसाठीची तरतूद होती, ६०,००० कोटी रुपये.

या निर्लेखित (राईट-ऑफ) केलेल्या कर्जातील आतापर्यंत केली गेलेली रिकव्हरी १४ % भरेल.

रिझर्व्ह बँकेच्या व्याख्येप्रमाणे, क्षमता असून, जी कंपनी कर्ज थकवते, तिला विलफुल-डिफॉल्टर्स म्हटले जाते.

गेल्या १० वर्षांत, त्यांची संचित संख्या आहे, ९ हजार २४९.

ज्यांच्याकडे १,९६,००० कोटी रुपये अडकले आहेत.

यातील पहिल्या ५० विलफुल डिफॉल्टरकडे ८७,००० कोटी रुपये अडकले आहेत.

बँकांनी कर्ज थकवल्यामुळे कोर्टात/एनसीएलटीकडे दाखल केलेल्या दाव्यांची संख्या, ३५,००० आहे आणि त्यात अडकलेली रक्कम आहे ५,९०,००० कोटी रुपये.

थकीत कर्जाच्या केसेस लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी, एनसीएलटी स्थापन केली गेली.

त्याला कॉर्पोरेटक्षेत्र, आपल्या फायद्यासाठी वापरत आहे. या अर्ध-न्यायिक यंत्रणेकडून, स्वतःची कर्जे माफ करुन घेत आहे. एनसीएलटीने दिलेले हेयर कट, तोंडात बोटे घालायला लावत आहेत. उदा. इलेक्ट्रोस्टील ६०%, अलोक इंडस्ट्रीज ८३% आणि रिलायन्स इन्फ्रा ९९ %.

भारतीय संघराज्य कल्पनेला सुरुंग लावणारे सत्य हे आहे की, भारतीय बँकिंग/सार्वजनिक बँकांची लूट करणाऱ्या मोठ्या प्रवर्तकांपैकी, बहुसंख्य एकाच राज्यातील 'गुजराथ' मधील आहेत!

_वरील आकडेवारीच्या जोडीला दुसरी आकडेवारी ठेऊन बघा... (बिझिनेस लाईन जानेवारी, २३)

शिक्षण आणि आरोग्यासारख्या सामाजिक क्षेत्रांसाठी केंद्र सरकारच्या तरतुदी जीडीपीच्या तुलनेत कमी होत आहेत.

**शिक्षण क्षेत्र...**

२०१९-२० अर्थसंकल्प : जीडीपीच्या ३.३२%

२०२३-२४ अर्थसंकल्प : जीडीपीच्या २.५%

**आरोग्य क्षेत्र...**

२०१९-२० अर्थसंकल्प : जीडीपीच्या २.३२%

२०२३-२४ अर्थसंकल्प : जीडीपीच्या १.९१%

**आता तिसरी आकडेवारी घ्या...**

सार्वजनिक बँकांनी, लाखो/कोटी रुपये राईट-ऑफ केल्यामुळे, त्या पाण्याखाली गेल्या असत्या. त्यांना बुडू न देण्यासाठी, केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षांत, ४,५०,००० कोटी रुपये अर्थसंकल्पातून भागभांडवल म्हणून दिले.

राजकीय अर्थव्यवस्था समजून घ्यायची असेल तर, तथ्ये/आकडेवारी गोळा करा, ती समोरासमोर ठेवा आणि त्यातील सहजपणे न दिसणारी रिलेशनशिप अधोरेखित करा !!!

– ***संजीव चांदोरकर,*** (२४ जानेवारी-२०२४)

## मोदी राजवटीची दहा वर्षे पूर्ण होत असताना, गेल्या दहा वर्षांचे रिपोर्ट-कार्ड तयार होऊ लागले आहे...




महाराष्ट्रात मात्र, स्वतःच्या किंवा वाडवडिलांच्या नावावर 'सातबारा' नसणाऱ्या... 'जन्मजात स्थानिक मराठ्यां'ना (जातिवाचक नव्हे); केवळ, 'शेतकरी' नसल्याचा दाखला नसल्याने महाराष्ट्रात 'शेतजमीन' खरेदी करता येत नाही. पण, अमिताभ बच्चन असो वा अमित शहा... कुणाही परप्रांतीयांना, महाराष्ट्राबाहेरच्या परप्रांतीय 'सातबाऱ्या'वर महाराष्ट्रात शेतजमीन खरेदी करता येते. म्हणूनच, महाराष्ट्रातल्या मूळ स्थानिक मायमराठ्यांच्या नावावरचा 'सातबारा' झपाट्याने कायमचा 'कोरा' व्हायला लागला आणि तो मोठ्याप्रमाणावर 'परप्रांतीय धनदांडग्यांच्या नावावर' (विशेषतः, जैन-गुजराथी-मारवाड्यांच्या) व्हायला लागला, ज्यातून जमीन-दलालांचं, स्थानिक-राजकारण्यांचं आणि महसूल (की, वसूल?) खात्यातल्या मंत्र्यांचं व सरकारी अधिकाऱ्यांचं चांगभलं होत, त्यांचं उखळ पांढरं होऊ लागलं...मात्र, शेतजमीन विकल्याने, अडल्यानडल्या मराठी-शेतकऱ्यांची उखळ, कालांतराने दाण्यादाण्याला 'मोहताज' होऊ लागली...!!!

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

**''झुकलेला 'मराठा' आणि करपलेला 'पराठा'...कुठल्याच कामाचा नसतो; असलाच तर, कुऱ्हाडीच्या दांड्यासारखा स्वतःच्याच गोतास काळ असतो; आता तरी, जागे व्हा मराठ्यांनो...जमल्यास, उघडा डोळे बघा नीट...!!!''**

मोदी १८-१८ तास काम करत असल्याचा ठो ठो दावा करणाऱ्या अंधभक्तांसाठी वरील खास संदेश...

''मनोज जरांगे-पाटील, हा कुणी ठडड सारख्या कुटील-धर्मविद्वेषी संघटनेकडून उत्तर-भारतीय अयोध्येतल्या रामलल्लाच्या (राम + अल्ला = रामलल्ला, ही 'धर्मराज्य पक्षा'ची देशात धार्मिक-सलोखा निर्माण करणारी व्याख्या) देखण्या-गोंडस मूर्तीसारखा छिन्नीचे घडवलेला नेता नव्हे; तर, आमच्या 'राकट देशा, कणखर देशा...दगडांच्या देशा' म्हणून गौरवलेल्या महाराष्ट्रातल्या 'अष्टविनायका'सारखं, ते एक 'कातळशिल्प'सदृश्य स्वयंभू-नेतृत्त्व होय''!


Rajan Raje - राजन राजे ... · 12s
आमचे मनोज जरांगे-पाटील, मोदींपेक्षा जास्त काम करतात; तेही १५लाखाचा कोट किंवा १०,०००कोटींची जेट न वापरता हो! साध्या गाडीघोड्यातून, पायी दरमजल करत...विशेष म्हणजे, ते समस्त मराठा-समाजासाठी काम करतात; आपल्या अंबानी-अदानीसारख्या मोजक्या भांडवलदार-मित्रांसाठी (Crony-Capitalists) नव्हे!

*....राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

सर्वसाधारणपणे, ''Lawyers are Liars'' असं म्हटलं जातं...पण, असाही एक सर्वोच्च न्यायालयातला जातिवंत वकील (जी वकील-प्रजात, हल्ली फारच दुर्मिळ होत चाललीय), ज्याच्याविषयी आपण अत्यंत अभिमानाने म्हणू शकतो की, ''This 'Lawyer' is not only 'Loyal' to the Constitution and 'Rule Of Law', but to the people of India...!!!''

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

https://youtu.be/wdDgHBMHSss?si=KqdDQnuXLeH9rRBR

# ठाण्याच्या वाघबीळ कावेसर भागात, ४०० ते ५०० वृक्षांची निर्दयी कत्तल!

## संबंधित विकासकाविरोधात, गुन्हा नोंदविण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील घोडबंदर रस्त्यावर असलेल्या, वाघबीळमधील कावेसर भागात, सुमारे ४०० ते ५०० वृक्षांची कत्तल झाली असून, ही वृक्षतोड एका बांधकाम व्यवसायिकाने केल्याची चर्चा आहे. कत्तल झालेल्या वृक्षांमध्ये हेरिटेज झाडांचा समावेश असल्याचे खात्रीलायक वृत्त, प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झालेले आहे. एकीकडे ठाणे शहरातील हरितक्षेत्र वाढविण्यावर भर दिला जात असतानाच, दुसरीकडे मात्र, वाघबीळ–कावेसर येथील नेरोलॅक कंपनीच्या जागेवरील ४०० ते ५०० वृक्ष निर्दयीपणे कापण्यात आल्याचे उघड झाले आहे. सदर घटना उघड होताच, ओवळा–माजिवडा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रताप सरनाईक, स्थानिक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि वृक्ष प्राधिकरणाचे उपायुक्त, यांनी घटनास्थळी जाऊन, याप्रकरणी कारवाईची मागणी केली असल्याचेही प्रसिद्धीमाध्यमांतून समजते. दरम्यान, या ठिकाणी वड–पिंपळ तसेच, अनेक दुर्मिळ प्रजातींची झाडे होती. या झाडांवर पक्षांचा नैसर्गिक अधिवास होता, तोच उध्वस्त करुन संबंधित धनदांडग्या व भांडवलदारी प्रवृत्तीच्या विकासकाने, निसर्ग आणि पर्यावरणाच्या संवर्धनालाच नख लावले आहे.** या अमानवी–अनैसर्गिक कृत्याबाबत 'त्या' क्रूरकर्मा बांधकाम व्यवसायिकाचे नाव जाहीर करून, त्याच्यावर त्वरित गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आग्रही मागणी भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी पक्ष असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त, महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचे उपायुक्त आणि कासारवडवली पोलीस स्टेशन यांच्याकडे एका लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, या संतापजनक घटनेच्या पार्श्वभूमीवर धर्मराज्य पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, संयुक्तपणे लिहिलेल्या पत्रात, प्रशासनाच्या निर्दशनास आणून देताना म्हटले आहे की, मुंबई शहराच्या वांद्रे या उपनगरात असणाऱ्या, नेक्टर को.ऑप.हौ. सोसायटीच्या आवारातील झाड, सोसायटीच्या अमित धुतीया नामक व्यक्तीने, बृहन्मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता तोडल्याने, २०१४ साली त्याच्याविरोधात गुन्हा नोंद झाला होता. सदर व्यक्तीने आपल्यावरील गुन्हा रद्द करण्यात यावा अशी मागणी, मुंबई उच्च न्यायालयाकडे केली असता, याप्रकरणी गुन्हा रद्द करण्यास न्यायालयाने नकार तर दिलाच; उलटपक्षी, झाडाच्या सर्व फांद्या तोडल्या गेल्याने, काही पक्षांची घरटी उध्वस्त झाली, काहींची अंडी फुटली, काही पक्षी मरण पावले, काही पक्षी जाळ्यात अडकले आणि काही पक्षी जाळ्यात अडकून त्यांना दुखापत झाली. परिणामी, सकृतदर्शनी गुन्हा घडल्याचे स्पष्ट होत असल्याने, दिलासा दिला जाऊ शकत नसल्याचे आदेश मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिले असल्याबाबत, प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, ठाणे शहरात वर्षभरात सहा मियावाकी वनांच्या माध्यमातून तब्बल १ लाख ३२ हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले आहे. शिवाय दोन ठिकाणी अशाच प्रकारच्या जंगल उभारणीचे काम सुरु असून, त्याव्यतिरिक्त आणखी तीन ठिकाणी, असे जंगल करण्याचे ठाणे महानगरपालिकेचे नियोजन आहे. एकीकडे ठाणे शहरातील हरित–क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीकोनातून 'मियावाकी'सारखे पर्यावरणवादी उपक्रम राबवायचे आणि दुसरीकडे मात्र, धनदांडग्या बांधकाम व्यावसायिकाने महापालिका प्रशासनाच्या नाकावर टिच्चून, बिनदिक्कतपणे एक–दोन नव्हे; तर, तब्बल ४०० ते ५०० वृक्षांची निर्दयी कत्तल करायची, यापेक्षा दुसरी लाजिरवाणी बाब ती कोणती? असा संतप्त सवाल महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, पत्रातून उपस्थित केला आहे. एक पर्यावरणवादी पक्ष म्हणून, 'धर्मराज्य पक्षा'च्या भावना अत्यंत तीव्र असून, वृक्षतोडीच्या या घटनेचा कठोर शब्दांत निषेध व्यक्त करीत असतानाच, याप्रकरणी संबंधित बांधकाम व्यावसायिकाचे नाव जाहीर करुन, त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाईअंतर्गत, गुन्हा नोंदविण्यात यावा; तसेच, या जागेवर उभे राहिलेले बेकायदेशीर बांधकाम तात्काळ निष्कासित करण्यात यावे. याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येऊन, संबंधित विकासकाला पाठीशी घालायचा प्रयत्न ठाणे महापालिका प्रशासन किंवा पोलीस प्रशासनाकडून झाल्यास, याविरोधात लोकशाही आणि सनदशीरमार्गाने जनआंदोलन उभे करु, वेळप्रसंगी उपोषणही पुकारण्यात येईल, असा गंभीर इशारादेखील महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, पत्राच्या शेवटी दिला आहे.

---

**रावणराज्यात राममंदिर..... कलियुगाचा अगाध महिमा...!!!**... *(पान क्र. १ वरुन)*

राम, १०० टक्के प्रामाणिक व पारदर्शक कारभार करणारा होता... तर, ही भाजपाई लोकं, 'इव्हीएम'पासून 'इलेक्टोरल–बॉण्ड'पर्यंत बनावटगिरी व लपवाछपवी करणारी!

**१४ वर्षांच्या वनवासानंतर रामाने अयोध्येत पाऊल ठेवताच, भरताला केलेला प्रश्न म्हणजे, आपल्या राज्यातले 'सेवक' (आजच्या भांडवली–परिभाषेत 'कामगार–कर्मचारीवर्ग') खूष आहेत ना, त्यांना समाधानकारक वेतन मिळतंय ना, हा होता... तर, ही भाजपाई लोकं, शेतकऱ्यांना मुळापासून उखडून फेकून देऊन त्यांच्या शेतजमिनी लुबाडून, बड्या गुजराथी–कंपन्यांना आंदण देण्यासाठी 'तीन काळे कायदे' घेऊन आले होते. लष्करात देशसेवेसाठी भरती होऊ पाहणाऱ्या तरुणाईचं भविष्य कोळपून टाकणारी अग्निपथ–अग्निवीर योजना आणि कामगार–कर्मचारीवर्गाला उध्वस्त करुन गुलामगिरीत ढकलण्यासाठी 'चार काळ्या कायद्यां'ची 'काळी कामगार–संहिता' (Labour-Code), ही यांचीच वैचारिक–अपत्यं!**

**रामाने, कुठल्याही समाजघटकावर य:किंचितही कधि अन्याय न करता, समस्त जनतेला सुखशांति–समाधान देणारं 'रामराज्य' आणलं... तर, ही भाजपाई लोकं, उभारताना दिसतायत, ते मूठभर भांडवलदारांना (त्यातले, बव्हंशी सगळे गुजराथी–भाषिकच) मालामाल करणारं 'रावणराज्य', ज्यात त्यांच्याच मालकीचे चकाचौंध रोषणाईने माखलेले मॉलटॉल्स–गगनचुंबी इमारती–पंचतारांकित बागा व हॉटेल्स दिसतील. रावणराज्यातली 'रावणाची लंका'देखील, अशीच 'वरकरणी सोन्या'ची होती (तीदेखील रावणाने, आपला सावत्रभाऊ कुबेराकडून ताकदीच्या बळावर जबरदस्तीने हिसकावून घेत, तिला आपली राजधानी बनवली होती... जसं भाजपा–सरकार, अनेकांचे उद्योग हिसकावून घेऊन कथितरित्या, गौतम अदानीच्या पदरात टाकताना दिसतं); पण, रावणाची लंका, तळागाळातल्या लोकांवर अन्याय–अत्याचार करणारी होती. त्यांचं शोषण करणारी व त्यांचा आक्रोश दमनकारी–यंत्रणांच्या (जशा, सध्या भाजपाई राजवटीत पोलिस, आयटी, सीबीआय, ईडी आदि दमनकारी–यंत्रणा कार्यरत आहेत) टाचेखाली दडपणारी होती... म्हणूनच तर, रावणाला 'राजधर्म' सांगत (आठवा, पं. अटलबिहारी बाजपेयींनी, २००२च्या गुजराथ–दंगलीच्या पार्श्वभूमीवर कुणाला 'राजधर्म' पाळायला सांगितला होता?) त्याला सन्मार्गावर आणण्याचा, त्याचा सख्खा भाऊ असलेल्या बिभीषणाने आटोकाट प्रयत्न केला होता. पण, तो विफल ठरल्याने, सत्प्रवृत्त बिभीषणाने 'विद्रोह' करत, न्यायी–वचनप्रिय रामाला युद्धात साथ दिली व रामाच्याच आशिर्वादाने पुण्यकर्मी बिभीषण, हनुमानासह 'सप्तचिरंजिवां'पैकी एक चिरंजीव बनला!**

**रामाने आपल्या पत्नीसाठी (म्हणजेच, एका स्त्रिच्या अब्रुच्या सुरक्षेसाठी व अपराध्याला मृत्युदंड देण्यासाठी घनघोर युद्ध केलं... तर, ही भाजपाई लोकं, 'ब्रिजभूषणपासून बिल्कीसबानो' प्रकरणापर्यंत असंख्य प्रकरणांमध्ये महिलांवर अत्याचार करताना किंवा महिलांवरील त्या लैंगिक–अत्याचारांचं समर्थन करताना दिसतात!**

**म्हणूनच जेव्हा, रासवट 'हिटलरी हुकूमशाही'च्या शैलीत...दुचाकी/चारचाकी वाहनांवर भगवे झेंडे लावत... 'जय श्रीराम', अशा उग्र घोषणा देत अथवा जाड्याभरड्या स्वरात 'जय श्रीराम' अशा आरोळ्या (जेव्हा, मूलतः राम हा शांति–संयमाचं प्रतिक, भारतीय–अध्यात्म मानत आलेलं आहे) ठोकत फिरणाऱ्या माथेफिरु तरुणाईचे बिनडोक जत्थे, 'डोंबिवलीपासून आंबोली'पर्यंत फिरताना दिसतात; तेव्हा, त्यांना पुन्हा नव्याने खरंखुरं रामायण सांगावंस वाटतं.**

...रामायणात, 'वाल्या'कोळ्याने आपल्या कुटुंबियांच्याच उदरभरणासाठी केलेल्या महापातकांचा वाटा उचलायला, त्याच्याच कुटुंबियांनी ठाम नकार दिला होता... ते स्मरुन, खरे 'रामभक्त' असाल, तरुणांनो; तर, संघ–भाजपाई लोकांच्या पातकात, असं अर्वाच्य वर्तन करत, आपण आपसूक का सहभागी होऊ इच्छिता, या प्रश्नाचं उत्तर द्या!

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# देशात हुकूमशाही आहे की, लोकशाही?

देश राज्यघटनेनुसार 'संघराज्यीय' पद्धतीने चालतोय की, राज्यघटनेतल्या त्रुटींचा गैरफायदा घेऊन मनमानी पद्धतीने??

('पेगॅसस सॉफ्टवेअर'सारखी अनेक लोकशाहीविरोधी व घटनात्मक तरतुदींना हरताळ फासणारी एकापेक्षा एक प्रकरणे उजेडात येत असतानाच... लोकशाहीमूल्यांना व संकेतांना पायदळी तुडवणारा सगळा घटनाक्रम काही थांबायलाच तयार नाही...)

१) भारत आज, बुलडोझर-रिपब्लिक, उद्या काय यादवीयुद्धग्रस्त बनाना-रिपब्लिक???

कॉ. वृंदा करात, ही ७५ वर्षीय लढवय्यी 'मार्क्सवादी कम्युनिस्ट' वृद्धा, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत घेऊन बेधडक बुलडोझरपुढे उभी राहीली तेव्हाच, तो 'जहाँगीरपुरी'तला गोरगरीबांचे संसार उध्वस्त करत गरगर फिरणारा 'बुलडोझर'थांबला... तोपर्यंत, सर्वोच्च न्यायालयाचा निकाल दिल्ली महापालिका-प्रशासनाला कळवून तब्बल दोनतीस तास उलटून गेले होते.... तळागाळातल्या शोषितवर्गांना, हे असेच बुलडोझरखाली चिरडून जातधर्माच्या नावावर तेढ निर्माण करत, दंगली पेटवून २०२४ मध्ये परत फिरुन सत्तेची पोळी त्यावर भाजून खाणार काय???...

२) काल शेतकरी, आज मुसलमान, उद्या कामगार.... परवा कोण? या सगळ्यांचाच एकूण 'लसावि/मसावि' काढला तर, दिसेल की, हे सगळे 'पिरॅमिड'च्या तळागाळातले दबलेले लोक आहेत... हे सारे 'संपत्ती-सेवा निर्माते' खरे, परंतु निर्मम 'भांडवली-व्यवस्थे'मुळे अतिशोषित व संपूर्ण दुर्लक्षित...

३) कामगार-कर्मचारीवर्गाचं आणि त्यांच्या संघटनांचं कंबरडं मोडून त्यांना कायमच्या अखंड गुलामगिरीत ढकलणारी, ४ काळ्या कामगार कायद्यांची संहिता, राज्यसभेत 'भाजपा'ला बहुमत नसतानाही, कोविड-१९ काळातील (२३ सप्टेंबर-२०२०) विरोधीपक्षीय खासदारांच्या अनुपस्थितीचा 'गैरफायदा' उठवून 'प्रासंगिक' बहुमताच्या आधारे, जणू एखादा पद्धतशीर कट रचल्यासारखी मंजूर करवून घेतली गेली...

४) गुजराथचे आमदार जिग्नेश मेवाणी यांची अटक व न्यायालयाकडून जामीनावर झालेली सुटका...

म. गांधी, पं. नेहरु या, हिमालयासारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची अत्यंत नीच पातळीवर जाऊन व अधमतेचा कळस गाठून खोटी बदनामी करणाऱ्यांना स्वपक्षीय पंतप्रधानांवर केलेली साधी टीकासुद्धा खपू नये???...

५) सर्वच बिगर-भाजपा राज्यांमध्ये 'राज्यपालां'चा 'राजकीय' उच्छाद....

अ) ताज्या बातमीनुसार, National Eligibility cum Entrance Test (NEET) विधेयक तामीळनाडू विधानसभेत संमत झालेलं असूनही व फेरविचारार्थ तामिळनाडू राज्यपालांनी पाठवल्यावर, विधानसभेच्या त्यासाठी खास बोलावण्यात आलेल्या विशेष सत्रात, पुन्हा संमत झाल्यानंतरही राज्यपाल त्यावर सही करायला तयार नाहीत. राज्यघटनेतील कलम २०० याकामी 'विशिष्ट कालमर्यादा' सुस्पष्टपणे घालून देत नसल्याचं 'निमित्त' पुढे करुन आजवरच्या लोकशाही-संकेतांना व 'सरकारीया-आयोगा'च्या शिफारशींना हरताळ फासून, ही राजकीय चालढकल बिनदिक्कत केली जातेय...

ब) राजीव गांधी हत्येप्रकरणी ३० वर्षांहून अधिक काळ अटकेत असलेल्या ए. जी. पेरारीवलन याला माफी देण्याबाबत तामीळनाडू सरकारने निर्णय घेतलेला असूनही, राज्यपालांची निर्णयावर मोहर उमटविण्याऐवजी घटनेच्या १६१ कलमाचा बादरायण आधार घेत, सदर माफीबाबतचा निर्णय राष्ट्रपतींच्या दरबारी सोपवून जाणिवपूर्वक टाळाटाळ व टोलवाटोलवी...

क) महाराष्ट्रात अजूनही विधानपरिषदेच्या १२ राज्यपालनियुक्त सभासदांची नेमणूक, सर्वोच्च न्यायालयाने कानपिचक्या देऊनही रखडलेलीच...

६) तब्बल १० वर्षांच्या, 'लोकपाल' कायदा संमत झाल्याच्या, प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर व न्या. पिनाकी चंद्रा घोष या 'लोकपालां'च्या निवडीला (त्यालाही, ५-६ वर्षांची अक्षम्य दिरंगाई केली गेलेली) ३-४ वर्षे उलटून गेल्यानंतर... एकदाचं सुमारे ६०,००० चौ. फुटांचं 'लोकपाल' या स्वायत्त संस्थेला स्वतःचं हक्काचं कार्यालय नुकतंच उपलब्ध करुन देण्यात आलंय.... ही एकूणच जाणिवपूर्वक केली गेलेली दफ्तरदिरंगाई, त्या पक्षाच्या सरकारच्या हातून घडतेय, ज्याचा २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भ्रष्टाचार-निर्मूलनासाठी 'लोकपाल' कायदा मंजुरी व त्याअंतर्गत 'लोकपाला'ची नियुक्ती, हा प्रचाराचा एक प्रमुख मुद्दा होता...

७) केंद्रिय शिक्षण मंडळाने (CBSE) सब ताज उछाले जाएँगे, सब तख़्त गिराए जाएँगे आणि बोल के लब, आजाद है तेरे, असं अन्याय-अत्याचारी व्यवस्थेला थेट आव्हान देत, अन्याय-अत्याचारपिडीतांच्यात लढ्याचं स्फुल्लिंग चेतविणाऱ्या जगप्रसिद्ध, भन्नाट ऊर्दू कवी 'फैज अहमद फैज' यांच्या कवितांवरचे दोन उतारे काढून टाकले आहेत... फैज, केवळ, पाकिस्तानी आहेत म्हणून की, त्यांचं क्रांतिकारी 'कवित्व' इथल्या उन्मत्त झालेल्या 'सत्तापिपासू, रक्तपिपासू-शोषक (Vampire-State System) व्यवस्थे'ला घातकी ठरु शकतं म्हणून???...

***...राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)

# जगात सर्वात वेगाने वाढणाऱ्या, भारताच्या जीडीपीत, उपभोगक्षेत्राचे योगदान कमी होत आहे!

**चालू आणि पुढचे वर्ष भारताची जीडीपी ७ टक्क्याच्या आसपास वाढेल, जो वाढदर इतर राष्ट्रांच्या वाढदरापेक्षा जास्त असेल. जीडीपीमध्ये दोन महत्त्वाच्या क्षेत्रांचे योगदान असते, भांडवली गुंतवणूक... ज्यातून पायाभूत सुविधा, उत्पादनक्षमता (सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र मिळून) तयार होतात आणि दुसरे, देशातील कुटुंबांचे उपभोग क्षेत्र.**

आतापर्यंत देशाच्या जीडीपीत, उपभोगक्षेत्राचा वाटा ५५% वगैरे होता. हा वाटा कदाचित कमी होईल अशी भीती व्यक्त होत आहे. कारण, त्यातील वाढ ४ टक्क्यावर घसरली आहे. ही ४ टक्के वाढ गेल्या २० वर्षांतील सर्वात मंद वाढ आहे. दुसऱ्या शब्दात, ज्या वेगाने ७ टक्के जीडीपी वाढत आहे, त्या तुलनेत उपभोगक्षेत्र ४ टक्के वाढत नाहीये.

कुटुंबांचे उपभोग, अर्थातच त्यांच्या क्रयशतीवर अवलंबून असतात आणि कुटुंबांची क्रयशक्ती, त्या कुटुंबातील प्रौढ सभासदांना मिळणाऱ्या मासिक उत्पन्नावर!

**देशात अंदाजे (नंबर्स राऊंड-ऑफ केले आहेत) २०% श्रमिक विविध क्षेत्रात काम करतात. त्यांच्या वेतनात, महागाई लक्षात घेता, घटच झाली आहे. ४०% प्रौढ स्वतःचे छोटे-मोठे उद्योग/शेती करुन उत्पन्न मिळवतात. नोटबंदी/जीएसटी/कोरोना यांच्या फटक्यातून हे क्षेत्र सावरलेले नाहीच, त्यात भर म्हणजे त्यांना आता मोठ्या कॉर्पोरेटशी स्पर्धा करावी लागत आहे. २०% प्रौढ हे, अनौपचारिक क्षेत्रात/शेतमजूर म्हणून आपले श्रम विकतात, त्यांच्या हलाखीबद्दल तर बोलायला नको...**

...आणि शेवटचं, २०% कॉर्पोरेटमधील/डॉक्टर्स/वकील/विविध सेवाक्षेत्रातील चांगल्या पगार व आमदनीवाले लोक आहेत. देशाचे उपभोगक्षेत्र, या सर्वात शेवटच्या २० टक्यांमुळे वधारलेलं आहे. एसयूव्ही आणि महाग कार्स, विमानप्रवास, घरे, किमती वस्तू, हॉटेल्स अशा अनेक क्षेत्रांना मिळालेली चालना या २०% उच्चभ्रू लोकांमुळे आहे.

जवळपास ८०% प्रौढ, उत्पन्न/वेतन/आमदनीसाठी, सतत झगडत आहेत. त्यांचा उपभोग त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून नाही; तर, उपभोगासाठी काढलेल्या कर्जातून आला आहे. उदा. अनसीक्यूर्ड कर्जाच्या आकड्यात वेगाने वाढ होत आहे. मागच्या वर्षात ३० टक्के. बाकीचे मुद्दे थोडावेळ बाजूला ठेवूया, अगदी स्थूल अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून बघितले तर, १४० कोटींच्या देशातील ८०% कुटुंबांच्या क्रयशक्ती न वाढता/वाढवता जीडीपीतील वाढ, याच वेगाने किती वर्षे वाढणार याला मर्यादा आहेत...

मानवतावाद/कल्याणकारी राज्य वगैरेदेखील बाजूला ठेवा; पण, स्थूल अर्थव्यवस्थेच्या राजकीय नेतृत्त्वाला, स्थूल अर्थव्यवस्थेच्या भवितव्याचे असे प्रश्न पडत नसतील...???

***...संजीव चांदोरकर*** (२२ जानेवारी-२०२४)

# ''लालकृष्ण अडवाणींना 'गहना कर्मणो गतिः', या श्रीकृष्णाच्या गीतेतल्या कर्मसिद्धांताचा जळजळीत प्रत्यय, अयोध्येतल्या राममंदिराच्या उद्घाटनानिमित्त चांगलाच आला असेल...!!!''

**अडवाणी, विनय कटियार, उमा भारती... ज्यांनी ज्यांनी म्हणून, 'मंदिर वहीं बनायेंगे' म्हणत दीर्घकालीन आंदोलन केलं, पोलिसांच्या लाठ्याकाठ्या खाल्ल्या, तुरुंगवास भोगले... त्यापैकी बहुतेक कुणालाही निमंत्रण नसावं? अडवाणींना तर, अगोदर निमंत्रण देत, नंतर प्रकृति-अस्वास्थ्याचं कारण जबरदस्तीने द्यायला लावून निमंत्रण अचानक रद्द करण्यात आलं. नितीन गडकरी, राजनाथसिंह यांची अवस्था तर उद्घाटन-समारंभात, ''हरवले आहेत, कुणाला सापडले तर कळवा'', अशी केविलवाणी झालेली!** उ. प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी तीन 'अ' (अमिताभ, अंबानी, अदानी) कॅमेऱ्यात मोदींच्या खालोखाल सतत टिपले जात असताना...आदित्यनाथ योगी, फोटोत फारसे दाखवलेच गेले नाहीत वगळता, एकाही मुख्यमंत्र्याला (मोदींना 'महाशक्ति' असं संबोधणाऱ्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचीही पत्रास ठेवली गेली नाही) साधं बोलावणंदेखील नाही... हे सगळे, एवढ्या मोठ्या अपमानाचं 'हलाहल', ही लोकं पचवूच कसे शकतात, हे एक मोठं कोडंच आहे! राजकारणात, लोकं एवढी कोडगी होऊ शकतात... गेंड्याच्या कातडीलाही लाजविण्याइतपत?



अयोध्येतल्या राममंदिराचं उद्घाटन (अयोध्येत अनेक राममंदिरं आहेत आणि त्या प्रत्येक मंदिरातले विश्वस्त व पुजारी... रामाचा इथेच जन्म झाला, असं ठासून प्रतिपादन करत असतात, ते वेगळंच), 'वन अँड ओन्ली वन, नरेंद्र मोदी शो' होता तो... गर्भगृहाच्या पावित्र्याची ऐशीतैशी करणारे कॅमेरे, थेट गर्भगृहात नेले जावेत? घडलंय असं कुठल्या देवस्थानात??

**...आणि, सगळ्यात महत्त्वाची बाब ही की, सगळ्या अयोध्येचं पारंपरिक पवित्र-स्वरुप लवकरच साफ नष्ट होईल आणि काँक्रिटच्या व्यावसायिक टोलेजंग वास्तूंमधून पैशाचा धूर निघताना दिसेल... जी, महाराष्ट्रातल्या शिर्डीची अवस्था झालीय; त्याहीपेक्षा वाईट अवस्था, भविष्यात शरयूतीरावरल्या अयोध्या-नगरीची झाली, तर आश्चर्य वाटायचं कारण नाही. 'अयोध्या-नगरी', झपाट्याने 'धंदेवाईक-नगरी' बनत जाणार आहे; कारण, तसं अगदी सोप्पं आहे, ''अयोध्येतल्या जमिनी, नकद दाम मोजून तमाम धनदांडग्या-मुजोर गुजराथ्यांनी अगोदरच खरेदी केलेल्या आहेत. राममंदिरातले आणि मंदिराभोवतीचे अनेक महत्त्वाचे व मलईदार ठेकेही, गुजराथ्यांनीच बळकावले असल्याचं समजतं!**

''राम आणि दाम'' याचा, भाजपातल्या 'धंदेवाईक धार्मिक लोकां'साठी, जो फारच घनिष्ट संबंध असतो, तो असा!

...म्हणजे, भावनिक-लाटेवर स्वार होणारी भोळसट मतंही निवडणुकीत मिळत रहाणार आणि करोडो भाविकांच्या येण्यामुळे प्रतिदिनी करोडोंचा धंदा होत रहाणार... ''राम के नाम... आम के आम और गुठली के दाम''!!!

११ दिवसांच्या अनुष्ठानानंतर, रामाच्या मूर्तिच्या पूजा व प्रतिष्ठापनेनंतर तासाभरातच, ''कुछ लोग कहते थे, राममंदिर बन जायेगा, तो आग लग जायेगी'', हे उद्गार नेमकं काय दर्शवतात... अंतःकरणातला राम की, रावण?

**तुम्हाला पं. नरेंद्र मोदींची तुलना, भगवान विष्णूशी करायचीय की, राजा विक्रमादित्याशी... ते तुमचं तुम्ही ठरवा, आम्ही त्याकडे दुर्लक्ष करु शकतो (कारण, तुम्हा 'स्वयंघोषित' हिंदुत्ववाद्यांना कोण अडवणार?); पण, जर त्यांची तुलना 'श्रीमान योगी' म्हणत, शिवछत्रपतींशी कुणी करु धजावेल; तर, हा उभा महाराष्ट्र, ते कदापि सहन करणार नाही, भाजपाला कधिही माफ करणार नाही... तो, जो कुणी श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्राचा कोषाध्यक्ष वगैरे असलेला स्वामी गोविंद देव गिरी महाराज, वरील वाक्ताडन करुन गेलाय...त्याचा 'धर्मराज्य पक्षा'तर्फे आम्ही तीव्र निषेध, तीव्र धिःक्कार करीत आहोत!**

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# आधी बैल घालवायचा आणि मग, झोपा करायचा (ते ही केल्यासारखं नाटक)...

## बॉम्बे'चं मुंबई केलं...पण, त्याचं सरतं 'मराठीपण' आणि वाढतं 'गुजराथीपण' थांबेना!

**''महाराष्ट्रातून (म्हणजे, मुंबईतून हो) तुमचा बोजाबिस्तरा गुंडाळून तुमच्या गुजराथला चालते व्हा'', असा मोठ्या राणाभीमदेवी थाटात (''मी मारल्यासारखं करतो, तू रडल्यासारखं कर'', 'पॅटर्न'चा तो थाट) आमचे मराठी नेते मुकेश अंबानींना फुसका 'आवाज' देताना पाहून...मुकेश अंबानी मनात हसत म्हणत असतील की, ''हू तो गुजराथमाच छू, तमे समझता नथी?''**

...ही मुंबई, हे ठाणे शहर (आणि, हळूहळू अशीच पुणे, नाशिक, नागपूर, रायगड सारखी अन्य शहरं-जिल्हे) गुजराथी-भाषिक धनदांडग्या-मुजोरांना आंदण दिल्यासारखी, जी आपली दारुण अवस्था झालीय; ती नेमकी कशामुळे झालीय...तर, ''गुजराथी लक्ष्मी आणि मराठी सरस्वती एकत्र नांदली पाहीजे'' अथवा ''कारखाना जगला तरच, कामगार जगेल'' किंवा ''गुजराथी आमच्यात दुधातल्या साखरेसारखे विरघळले; तर, उत्तर भारतीय आमच्यासाठी उपद्रवी ठरले'' असे म्हणत, लक्ष्मीपुत्र गुजराथ्यांना जोजोवणाऱ्या आणि 'कंत्राटी-कामगार पद्धत' महाराष्ट्रात आणून मराठी-कामगारांचा बरबाद करणाऱ्या...धनाढ्य गुजराथी-भांडवलदारवर्गाच्या पैशाच्या बळावर निवडणुका लढवणाऱ्या आणि गुजराथी-पैशावरच सार्वजनिक पूजा-नवरात्रौत्सव-गणेशोत्सव-दहीहंड्या-भंडारे-गरबे साजरे करत भोळसट मराठ्यांची महापालिका-विधानसभा-लोकसभा निवडणुकांमध्ये घाऊक-पद्धतीने ठोक मतं हमखास गोळा करणाऱ्या अवसानघातकी मराठी-नेत्यांमुळेच, ही परिस्थिती ओढवलीय. फरक एवढाच की, कालपर्यंत ज्या धनदांडग्या गुजराथ्यांना डोक्यावर घेऊन ही नेतेमंडळी नाचत होती; तेच आता मराठी-माणसांच्या ऊरावर चढून महाराष्ट्रात थयथयाट करतायत, मराठ्यांना (जातिवाचक नव्हे) लाथाडतायत... पण, हे आकळण्याएवढी सारासार बुद्धी, आम्हा मराठ्यांकडे शिल्लक राहीलीयच कुठे...???

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

२०१४ च्या लोकसभा निवडणुकांवेळी नरेंद्र मोदी यांनी नवादा येथील सभेत तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर आरोप करत म्हंटले होते की, 'मनमोहन सिंग' सरकार हरित क्रांतीच्या जागी गुलाबी क्रांती (मांसाचे उत्पादन) यावर जास्त जोर देत आहे.

**ते मांस उत्पादकांना सबसिडी आणि करात सूट देत आहेत. पण, नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान बनल्यानंतर मात्र देशातून मांसाची निर्यात प्रचंड प्रमाणात वाढली, आणि पहिल्यांदा देशाला बासमती तांदळापेक्षा जास्त मांसाच्या निर्यातीमधून ४.८ अरब डॉलरची कमाई झाली.**

विशेष बाब अशी आहे की, नरेंद्र मोदी ज्यावेळी मुख्यमंत्री नव्हते त्यावेळी म्हणजे २००१-०२ मध्ये गुजरात मधून दरवर्षी १०६०० टन गोमांस निर्यात होत होते.

नरेंद्र मोदी गुजरातमध्ये मुख्यमंत्री बनल्यानंतर म्हणजेच २०१०-११ मध्ये ही मांसाची निर्यात वाढून २२००० टन झाली.

(दै. जनसत्ता स्पेशल रिपोर्ट, दि. ४ ऑक्टोबर २०१५, https://www.jansatta.com/national/india-no-1-in-meat-export-due-to-heavy-subsidy-by-narendra-modi-govt/42974/)

सध्या गोभक्तांचं सरकार या देशात सत्तेवर असतानाही इथे कत्तलखान्यांमध्ये रोज लाखो गायी-बैल कापल्या जातात. धर्माच्या नावाने हे हिंदुत्ववादी जरी गोहत्येचा विरोध करत असले तरी आपल्या देशातील सर्वात मोठे चार गोमांस निर्यात करणारे हे हिंदू व्यापारी आहेत हे सत्य लपविले जाते.

देशातील सर्वात मोठा कत्तलखाना आहे 'अल कबीर एक्स्पोर्ट प्रायव्हेट लि.' जो चारशे एकरमध्ये व्यापलेला आहे. याचे मालक आहेत सतीश सब्बरवाल आणि अतुल सब्बरवाल. याचे मुख्य कार्यालय मुंबईतील नरिमन पॉईंट इथे आहे. दुसरे अरेबियन एक्सपोर्ट (सुनील करन), तिसरे एमकेआर फ्रोजन फूड्स (मदन एबट) व चौथे पीएमएल इंडस्ट्रीज (ए.एस. बिंद्रा) ही ती चार नावे आहेत. याशिवाय



तमिळनाडूतील 'अश्विनी ग्रो एक्स्पोर्ट' ज्याचे मालक आहेत राजेंद्रन. पण यांच्याविरोधात कुणी चकार शब्द काढत नाही.

**दोन-चार गोवंश वाचविल्यावर अभिमानाने मिरवणाऱ्या युवकांनी वरील कत्तलखाने बंद व्हावेत, यासाठी प्रयत्न करायला हवेत. हे म्हणजे कॅरीबॅग वापरवर बंदी पण उत्पादनावर बंदी नाही असे आहे. एक-दोन गाय-बैल कापून खाणाऱ्यांमुळे धर्म आणि गोवंश धोक्यात येतो, पण रोज हजारो गायी जिथे कापल्या जातात, त्यामुळे ना धर्म धोक्यात येत ना गोमाता.**

**नरेंद्र मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आल्यामुळे बाकी काही विकास होवो न होवो, परंतु भारत हा जगातील सर्वात मोठा मांस निर्यात करणारा देश बनला आहे.**

दरवर्षी जगात एकूण निर्यात होणाऱ्या मांसापैकी एकटा भारत ५० टक्क्यांपेक्षा जास्त मांस निर्यात करतो. वर दिलेल्या नावांशिवाय आणखीही हिंदूंचे अनेक कत्तलखाने देशात आहेत, जिथे लाखो गायी रोज कापल्या जातात; परंतु ह्या गोरक्षकांना दिसतात खाण्यासाठी एक-दोन ढोरं कापणारे गरीब लोकं. कारण ते सॉफ्ट टार्गेट असतात. प्रतिकार करू शकत नाहीत. धर्माची इतकीच काळजी आहे तर हे मोठे कत्तलखाने हे सरकार का बंद करत नाही? ह्या कत्तलखान्यांच्या मालकांवर हे गोरक्षक का चालून जात नाहीत? २-४ गायी कापल्याने धोक्यात येणारा ह्या स्वयंघोषित गोभक्तांचा धर्म रोज लाखो गाई कापल्या गेल्याने, हिंदूंनी कत्तलखाने चालविल्याने धोक्यात येत नाही?

(स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव या माझ्या पुस्तकातून)

हा मा. मोदींचा फोटो बघून शेवटी राहवलं नाही. म्हटलं मोदींजींचे गो-प्रेम देशाला कळायला हवं.. मोदीजी हे लाखो गाई कापणारे कत्तलखाने कधी बंद करणार? या रामराज्यात रोज लाखो गायींची हत्या होत राहणार काय?

***–चंद्रकांत झटाले, अकोला***

---

*धर्मराष्ट्राचे कडक डोहाळे लागून हैराण झालेल्या सर्व माताभगिनींनो,*
*नीट वाचा आणि विचार करा...*
*अमेरिकन घटना अस्तित्वात आली १७८९ मध्ये.*
*फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रेंच-घटना अस्तित्वात आली १७९१ मध्ये.*
*ब्रिटनची राज्यघटना किमान साडेतीनशे वर्षे जुनी आहे.*
*अमेरिकन महिलांना मताधिकार मिळाला १९२४ मध्ये.*
*फ्रेंच महिलांना मताधिकार मिळाला १९४६ मध्ये.*
*सगळ्यात जुनी लोकशाही असलेल्या इंग्लंडमध्ये महिलांना मताधिकार मिळाला १९२८ मध्ये.*
*भारताच्या राज्यघटनेने २६ जानेवारी १९५० ला महिलांना मताधिकार दिला.*
*घटना समिती आणि पहिलं मंत्रिमंडळ... दोन्हीमध्ये भारतीय महिला सहभागी होत्या.*
*१९९३ साली महाराष्ट्र राज्याने महिलांना एक तृतीयांश आरक्षणाचा कायदा केला.*
*बायांनो,*
*सहज मिळाली म्हणून एखाद्या गोष्टीची किंमत कमी होत नाही.*
*हा अनमोल ठेवा तुम्हाला सहज मिळालेला असला; तरीही, त्याच महत्त्व खूप मोठं आहे.*
*तुम्हाला संविधानाने दिलेले अधिकार महत्त्वाचे आहेत. त्यांची जपणूक तुमच्या हातात आहे.*

*तुम्ही जर धर्माधारीत देशाची मागणी करत असाल; तर, पहिली कुऱ्हाड तुमच्या अधिकारांवर चालणार आहे.*

*स्त्रियांना देवीचा दर्जा देण्याचा कावा; केवळ, त्यांना मुर्खात काढण्यासाठी आहे... मखरात बसवून त्यागाची अपेक्षा, त्यामागे आहे.*

*सगळे धर्म, 'पुरुषसत्ताक' आहेत, हे लक्षात असू द्या. कुणी 'नरकाचं दार' म्हणतं, कुणी 'ताडन के अधिकारी' म्हणतं; पण, बायकांना पायाजवळ ठेवण्याचं समर्थन सगळेच धर्म करतात.*

*धर्माधारीत देशात, तुमची लायकी आणि किंमत फक्त, पोरं पैदा करणे आणि भाकरी थापणे, एवढीच असणार आहे. निर्णय तुमचा....*

*तुम्हाला भाकरी थापून पोरवडा सांभाळायचाय की, शिक्षण घेऊन स्वतंत्र होऊन आपलं स्वतःचं जग निर्माण करायचंय...*


***...आनंद शितोळे***

*आपल्या_धडावर_आपलेच_डोके प्रजासत्ताक_दिन*
*Thanks_Ambedkar आयडिया_ऑफ_इंडिया*

---

'आर्थिक-विषमते'च्या व जातधर्मविद्वेषाच्या क्रूर नंगानाचाने देश, जेवढा जेवढा संत्रस्त होऊन देशात त्राही त्राही माजेल आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, निसर्ग-पर्यावरणावरणीय महासंकटांमुळे मानवी-अस्तित्वासह समस्त सजीवसृष्टी धोक्यात आल्याने, जगभरात जेवढा जेवढा म्हणून हाहाःकार उडत जाईल... तेवढा तेवढा, तो गांधी' नावाचा 'महात्मा', आमचा 'राष्ट्रपिता' दिवसागणिक अधिकाधिक मोठा होत जाईल!

...तुमच्या महाराणीने माझी बाकीची वस्त्रं हिरावून घेतलीयत...साधा पंचा नेसून, ब्रिटीश-जनतेला असं ठणकावून सांगणाऱ्या, आमच्या अर्धनग्न खऱ्याखुऱ्या 'फकिरा'ला ... किंवा पहने सो काँते, काँते सो पहने, असं भारतीय जनतेला साधेपणाचं-साध्या रहाणीचं मर्म बजावून सांगणाऱ्या काटकुळ्या; पण, अतिशय काटक देहाच्या मोहनदास करमचंद गांधीला... विस्मृती वा कालबाह्यतेचं मरण, साधं शिवणेसुद्धा शक्य नाही...!!!



या पृथ्वीच्या पाठीवर, असा एक हाडामांसा-रक्ताचा जिवंत माणूस, कधिकाळी मार्गक्रमणा करुन गेला... यावर, येणाऱ्या पिढ्यांना साधा विश्वास ठेवणंसुद्धा कठीण जाईल, असं अल्बर्ट आईन्स्टाईनसारखा, आजवरचा जगातला सर्वात मोठा प्रज्ञावान व विचारवंत शास्त्रज्ञ... ज्यांच्या संदर्भात बोलून गेला, त्या म. गांधींचं नाव घेऊनच किंवा निंदा करुनच लोकं मोठी झाली... एवढंच नव्हे; तर, जगाच्या दुर्दैवाने अखेरीस त्या 'महात्म्याची हत्या' करुन, हत्या घडवून... त्या हत्येच्या महापातकातूनच लोकं प्रसिद्धीच्या झोतात आली... त्यात त्यांचं स्वतःचं असं, 'स्वयंभू' मोठेपण किती, 'सच्चाई किंवा कांगावा' किती, हा प्रश्न उरतोच!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# सजीवसृष्टीसह, मनुष्यजात नष्ट होण्याचा धोकादायक संकेत!

**ॲमेझॉनच्या जंगलांएवढं मोठं विस्तीर्ण नसलं; तरीही, शेकडो-हजारो हेक्टरमध्ये (दिल्लीपेक्षाही मोठं, असं १८७६ चौ.कि.मी क्षेत्रफळ) पसरलेलं, हे 'हसदेव'चं जंगल... ॲमेझॉनच्या जंगलाप्रमाणेच निसर्ग-पर्यावरणाचं संतुलन राखण्याकामी आपलं स्वतःचं महत्त्वं राखून आहे. 'भांडवली-भस्म्यारोग' लागलेल्या महापातकी गौतम अदानीला जगातला अव्वल श्रीमंत करण्यासाठी (आणि, अर्थातच त्याच्याकडून हजारो कोटींचा 'चंदा' वसूल करण्यासाठी), तेथील खाणकामद्वारे करोडो टन कोळसा व त्या कोळशाच्या बळावर हजारो कोटींचा कोळशासारखा 'काळा पैसा' अदानीला मिळवून देण्यासाठी, भाजप-राजवटीत यापुढे चालूच रहाणाऱ्या या निर्घृण वृक्षतोडीनंतर, त्या जंगलाचं हे महत्त्वपूर्ण निसर्ग-पर्यावरणीय वैशिष्ट्य लवकरच नष्ट होईल. करोडो टन कोळसा, खाणीतून उपसून हवेत जाळला जाईल आणि 'जागतिक-तापमानवाढी'ला त्यातून प्रलयंकारी चालना मिळेल...आणि तो, उर्वरित सजीवसृष्टीसह मनुष्यजात नष्ट होण्याचा एक धोकादायक संकेत असेल!**

राजस्थान व छत्तीसगडमध्ये भाजप सरकारं असताना, इथलं सरकारी खाणकाम, अदानी-एंटरप्रायझेसला अपारदर्शक पद्धतीने अचानक कसं दिलं गेलं, ही एक महाभ्रष्टाचाराची चित्तरकथा म्हणून उजेडात येऊ शकेल (अर्थातच, २०२४च्या निवडणुकीत मोदी-शाह सरकारचा पाडाव झाला तरच) असा ठाम दावा, 'द वायर'तर्फे करण्यात आलाय. लक्षात घ्या, याच कोळसा-खाणकामाच्या कथित घोटाळ्याबाबत २०१४ साली भाजपाने, 'कॅग'च्या विनोद रायना हाताशी धरुन रान उठवलं होतं... जो घोटाळा, कधि झालाच नव्हता, हे पुढे जाऊन सिद्ध झालं; पण तोपर्यंत, त्यातून भाजपाचे नरेंद्र मोदी-सरकार सत्तेवर येऊन, देशाचं अपरिमित नुकसान होऊन गेलं होतं.

**म. प्रदेश, झारखंड व छत्तीसगड, या तिन्ही राज्यांच्या सीमांना भिडणारं व भारताच्या नकाशाच्या बरोबर मध्यावर असलेलं, तसेच अनुपम निसर्ग-सौंदर्याने व जैववैविध्याने नटलेलं हे 'हसदेव जंगल'...भाजपाई-संघीय लोकं, त्या गौतम अदानी नावाच्या 'भांडवली-बकासुरा'च्या घशात घालून मोकळे होतायत आणि तिकडे ''अयोध्येत मारे, 'राममंदिरा'चे बेगडी हिंदुत्व-वादी वारे वहातायत''!**

वस्तुतः, हिंदू, बौद्ध, जैन धर्म हे, निसर्ग-पर्यावरणाप्रति अत्यंत संवेदनशील! हिंदू धर्म, तर चराचर सृष्टीमध्ये, सर्व प्राणिमात्रांमध्ये परमात्म्याचा अंश पहाणारा धर्म! अशातऱ्हेच्या, आधुनिक मनुष्यजातिच्या या वासना-विकारांनी भरलेल्या चंगळवादी... विनाशकारी व जीवनविरोधी विकासाची, हिंदुधर्मातल्या एकातरी ग्रंथामधून, यत्किंचितही पुष्टी केलेली कुठे दिसत्येय का, ते डोळे उघडून एकदा नीट तपासून पहाच.

**संपूर्ण 'भारतीय-अध्यात्म'च मुळी (हिंदू, बौद्ध, शीख, जैन व अन्य भरतभूमीवर नांदणाऱ्या आध्यात्मिक प्रवाह-उपप्रवाहांनी मिळून बनलेलं), या 'जैविक-साखळी'ला निरतिशय पूजनीय-वंदनीय मानूनच, त्या भरभक्कम पायावर उभं राहीलेलं आहे... असं असतानाही अंदमान-निकोबारमधील ग्रेट-निकोबारमधील अतिप्राचीन असे ८ ते १० लाख महाकाय वृक्ष जसे तुटतायत, कापले जातायत आणि मुंबईतल्या आरे जंगलाची मेट्रो कारशेडसाठी रातोरात गवताची छाटणी करावी, तशी सहजगत्या कापणी केली गेली...** तसेच, आता 'हसदेव'च्या प्राचीन व दुर्मिळ घनदाट जंगलावर, तथाकथित 'हिंदू-राष्ट्र' व 'हिंदुत्वाच्या भाकड बाजारगप्पा मारणाऱ्या, भाजप व संघाकरवी गंडांतर आलंय!

**त्या हसत्या-खेळत्या 'हसदेव' जंगल-परिसराला शोकमग्न करुन 'अरुण्यरुदन' करायला भाग पाडणारे... संघीय आणि.भाजपाई लोकं, तरीही कुणाला अजूनही 'हिंदुत्ववादी' वाटू शकतात???**

तसं असेल तर, अशा साऱ्याच धर्मविरोधी लोकांच्या अकलेची कीव करावी, तेवढी थोडीच... त्यांच्या मेंदुवरच्या 'करड्या रंगाच्या घड्या' (Grey Matter) 'अंधभक्ति'ने साफ मिटून तर गेल्या नाहीत ना; याची जरुर तपासणी व्हावी...हो, कारण, ''भक्त प्रल्हाद, या महान विष्णुभक्त असलेल्या, आपल्याच पुत्राचा अत-ोनात छळ करणाऱ्या भयंकर क्रूर व महाराक्षसीवृत्तीच्या ''हिरण्यकश्यपु'लाच, 'विष्णुचा अवतार' मानण्याचा...नवा उफराटा जमाना आलाय''!

घनघोर कलियुग, अजून वेगळं काय असू शकेल???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...The First Green-Political Party Of India)




छत्तीसगडच्या आपल्या निवडणूक-जाहीरनाम्यात, ज्या भाजपाने 'हसदेव'च्या जंगलातल्या कोळसा-खाणकामाला, तेथील जनतेशी केलेली गद्दारी व धोका म्हटलं होतं व सत्तेवर येताच, ते खाणकाम थांबवण्याचा 'वादा' (खरं म्हणजे, 'चुनावी-जुमला') केला होता...त्याच, 'हसदेव'च्या जंगलातल्या, ३०,००० प्राचीन वृक्षांवर, भाजप छत्तीसगडमध्ये सत्तेवर येताच तत्काळ गदा आली! स्थानिक गावांमधील सरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्यांना व गेली १० वर्षे त्याविरोधात चळवळ करणाऱ्यांना...सलग तीन दिवस बेकायदेशीररित्या डांबून ठेवत, सुमारे ५०० पोलिसांकरवी (दिमतीला, झाडं कापणाऱ्या ५०० इलेक्ट्रिक आरा मशिन्स होत्या), ही भारतीय-राज्यघटनेतल्या तरतुदींचं बेधडक उल्लंघन करणारी संतापजनक कारवाई करण्यात आलीय. त्याकामी, क्षणार्धात मोठमोठी तीला होत्या.

## Adani Group razes Air India colony; residents protest

The Gautam Adani-led Mumbai International Airport Ltd. (MIAL) started the demolition of 20 uninhabited, dilapidated structures at the Air India Colony at Kolivery village in Santacruz of Mumbai. In March 2022, barely a month after Air India was handed over to Tata Sons, MIAL issued a notice to the airlines asking it to surrender land that is not core to its operations. These colonies were home to 1,600 families. According to the MIAL spokesperson, the demolition was conducted "in strict adherence to the law and accordance with the permission/handover granted by AIAHL, the PSU asset holding company of erstwhile Air India".

कालपर्यंत, नरेंद्र मोदींचा गौरव करताना न थकणारे, आता त्यांच्याच खास मित्राच्या (गौतम अदानी)

कंपनीचा तडाखा बसल्यावर शिव्याशाप देतायत...काय म्हणावं या मध्यमवर्गीय लोकांना? कालपर्यंत इतरांची घरं बुलडोझरने पाडली जात असताना...शांत-निवांत बसून 'अंधभक्ति'त रत होते आणि आज...???

जरा थांबा आणि पहात रहा...भांडवलदारवर्गाची बकासुरी भूक भागवण्यासाठी आणि भाजपा-संघीय 'धर्मविद्वेषी व भांडवली' विचारसरणीच्या लाखो चेलेचपाट्यांना शासकीय कामांची; तसेच, खासगीकरणातून वेगवेगळी मलईदार कंत्राटं देण्यासाठी व देताना, ही वेळ सगळ्यांवरच यायचीय!

...प्रथम शेतकर्यांवर (३ काळे शेतकरी-कायदे), मग मुसलमान (बुलडोझर-रिपब्लिक), नंतर कामगार

('काळी कामगारसंहिता' किंवा 'ब्लॅक लेबर-कोड') व लष्करात भरती होऊ इच्छिणारे नवतरुण (अग्निपथ-अग्निवीर) आणि आता, मध्यमवर्ग!

...बेरोजगारी-अर्धरोजगारीचे भयंकर चटके, महागाईचा डोंगर, प्रशासनिक जबरदस्ती, पर्यावरणीय संकटं...या सगळ्याचाच कठोर सामना आपल्याला करावा लागणार आहे...२०५ लाख कोटी कर्ज आपल्या डोक्यावर ठेवणाऱ्या व सार्वजनिक शिक्षण-आरोग्य सुविधा उभारण्याऐवजी मंदिरं उभारत बसणाऱ्या भाजपाई मोदी सरकारच्या कुकर्मामुळे!

# व्हाय ओन्ली गांधी वॉज किल्ड???


**इतर कोणत्याही तत्कालीन भारतीय राजकीय नेत्यांपेक्षा, म. गांधींचीच 'हत्या' घडवून आणावी... असं, 'नथ्थू-पंथीयां'ना (नथुराम गोडसे पंथीयांना) तीव्रतेनं का वाटलं असावं???**

...तर, त्याचं उत्तर हे की, म. गांधी, ही केवळ काही विशिष्ट उद्देशपूर्तिच्या मर्यादित रिंगणात काम करणारी 'व्यक्ति' नव्हती; तर, ती सगळ्या जगण्याच्याच आसाला आणि जगण्याच्या व्यामिश्रतेला भिडलेली आणि त्यावर, विद्रोही-कृतिसह प्रभावी भाष्य करणारी 'महाशक्ति' होती! 'ब्रिटीश-भांडवलशाही' गदागदा हलवत मोडून काढण्याची... पूर्णतया नेस्तनाबूत करण्याची क्षमता, म. गांधींच्या Earth provides enough to satisfy every man's needs, but not every man's greed, या निसर्ग-पर्यावरणस्नेही क्रांतिकारक विचारसरणीत होती... म्हणूनच, फक्त, साधा पंचा नेसणारा 'गांधीबाबा'च सगळ्या तत्कालीन 'भांडवलदारां'च्या नजरेत भयंकर खुपत होता (म. गांधी राणीच्या भेटीला गेले असतानाचे विन्स्टन चर्चिल यांचे फुत्कार आठवून पहा) आणि त्याचीच, परिणती त्यांच्या क्रूर हत्येत झाली... भले, मग, त्या समर्थनार्थ बदमाषीने हिंदू-मुस्लिम वैरभावाची, गांधीच्या तथाकथित 'मुस्लिम-अनुनया'ची आणि पाकिस्तानला दिल्या गेलेल्या ५५ कोटींची तद्दन ढोंगी कोल्हेकुई, व्हाय आय किल्ड गांधीवाल्या नतद्रष्ट ' 'नथ्थूपंथीयां'कडून कितीही केली जावो!

**आजच्या, अवघ्या जगाला ग्रासणाऱ्या, पर्यावरणीय महासंकटकालीन परिस्थितीत म्हणूनच, म. गांधींची साधी रहाणी, उच्च विचारसरणी हीच एकमात्र उपाययोजना म्हणून जोरकसपणे पुढे येऊ पहातेय, हे कशाचं लक्षण आहे? शहरातून खेड्याकडे चला, असा संदेश देत... नैसर्गिक शेती, नैसर्गिक आहारविहारासोबतच केवळ, 'लहानसहान धरणां'चाच (महाकाय धरणांना त्यांचा तीव्र विरोध होता, त्या विरोधाचं महत्त्वं आज निसर्ग-पर्यावरणाचा विध्वंस होऊन सदरहू धरणं प्रचंड गाळाने भरल्यानंतरच आपल्या ध्यानी येतंय) तहहयात पुरस्कार करणारा, तो एकमेव द्रष्टा नेता होता!**

नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'द गार्डियन'च्या वृत्तानुसार, जलचरांचा नैसर्गिक अधिवास व मोसमागणिक होणारं त्यांचं नैसर्गिक स्थलांतर यांच्या सुरक्षिततेसाठी व नदीचं 'जैविक-आरोग्य' कायम राखण्यासाठी, नॉर्वेजियन सरकारने ट्रॉमसा नदीवरील धरण डायनाईटचा स्फोट घडवून उडवून दिलं, जेणेकरुन बंदिस्त झालेली नदी मोकळी होऊन पुन्हा खळाळून वाहू लागली. स्पेन, फ्रान्स आणि ब्रिटनदेखील शक्य तिथे हाच नॉर्वेचा कित्ता गिरवत काही मोठी धरणं फोडून आपापल्या नद्यांचे प्रवाह मोकळे करणार आहेत... आम्ही मात्र, 'माँ गंगे'ला अधिकाधिक धरणं व मोठमोठाले बंधारे बांधून साफ बंदिस्त करत सुटलेलो आहोत, मग त्या गंगामातेवरील अत्याचाराविरुद्ध आमरण उपोषणाच्या आंदोलनात संत निगमानंद, संत ज्ञान स्वरुप सानंद, संत गोपालदास, संत शिवदास यासारख्या जातिवंत संतमहात्म्यांचे जीव का जाईनात! भाक्रानांगल, हिराकूड, नागार्जुनसागरसारख्या महाकाय धरणांना 'आधुनिक भारताची मंदिरे म्हणून संबोधणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरुंनीही पुढे जाऊन, महाकाय धरणांनी निसर्ग-पर्यावरणाचा ढासळवून टाकलेला समतोल अनुभवल्यानंतर, आपल्या चुकीची जाहीर कबुली देत व म. गांधींच्याच विचारसरणीला अंतिमतः योग्य ठरवत, त्या मोठ्या धरणांना महाकायतेचा महारोग(Disease Of Gigantism) असं अखेर स्पष्टपणे म्हटलं होतं, हे इथे मुद्दाम नमूद करायलाच हवं.

**मानवी क्षमतेत 'अत्यावश्यक' भर घालण्याइतपतच मर्यादित 'यांत्रिकीकरण' असावं... अशी, अलौकिक दूरदृष्टी व बौद्धिक झेप फक्त, पंचा नेसून उघड्या अंगाने फिरणाऱ्या त्या लोकविलक्षण 'फकिरा'कडेच होती... भांडवलशाहीतल्या बेलगाम 'शहरीकरण व यांत्रिकीकरणा'ला दिलं गेलेलं ते थेट 'स्वदेशी' आव्हानच होतं!**



वैष्णव जन तो तेणे कहिये, पीड परायी जाणे रे, म्हणतं 'दरिद्री-नारायणा'चं आर्थिक-पुनरुत्थान करु पहाणारा 'गांधीवाद'... हे, मस्तवाल भांडवलशाहीला ग्रहण लाऊ शकण्याचं सामर्थ्य असलेलं 'सुदर्शन-चक्र'च होतं!

टेलिफोन, टाईपरायटर या यंत्रांचा वापर करणारा हा महात्मा, मानवी क्षमतेत भर घालणाऱ्या 'यंत्रा'ला नव्हे; तर, मानवाचं उच्चाटन करणाऱ्या 'यंत्रवादा'ला माझा विरोध आहे असं म्हणायचा किंवा पहने सो काँते और काँते सो पहने म्हणतं, 'स्वदेशी'चा नारा द्यायचा; तेव्हा, तो एकप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच भारतात 'भांडवलीशाही'चा उधळू पहाणारा 'अश्वमेध'च रोखू पहाण्याचं धार्ष्ट्य दाखवत होता. ग्राहको देवो भव (भांडवलशाहीचा कुठल्याही मार्गाने कमावलेला 'नफा' हाच 'परमेश्वर' असण्याच्या काळ्या पार्श्वभूमीवर) किंवा गव्हाच्या पीठाच्या पुऱ्या करुन तळणं म्हणजे, त्यातला अन्नांश नाहीसा करुन सौम्य विष तयार करणं होय... अशासारखी, त्या अवघड काळची मूलभूत प्रतिपादनं, त्या महात्म्याच्या प्रज्ञा आणि दूरदर्शीपणाचा प्रत्यय करुन देतात आणि आजही आपल्याला निव्वळ थक्क करुन सोडतात!

**म. गांधींनी पाश्चात्य जगतातली विकसित होत चाललेली 'भांडवलशाही' जवळून पाहिली होती. ती निसर्ग-पर्यावरणाला प्रदूषित करण्यासोबतच त्याचा विध्वंस कशाप्रकारे घडवून आणतेय, एवढंच त्यांनी जाणलं किंवा पाहीलेलं नव्हतं.... तर, त्यापेक्षाही भांडवलशाहीच्या माध्यमातून अतिशय धोकादायक होत चाललेलं मानवी मनांचं 'प्रदूषण' आणि मानवी संवेदनांचं 'विध्वंसीकरण'ही त्यांनी प्रत्यक्षात अनुभवलं होतं. प्रशासक-व्यवस्थापक, शास्त्रज्ञ, लेखक-साहित्यिक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर्स, तंत्रज्ञ इ. बुध्दिजिवी मंडळींना भांडवलशाहीचा एक अपरिहार्य, अटळ परिणाम म्हणून, आपली घरं किंवा फ्लॅट्स् भाड्याने द्यावेत; तेवढ्या सहजतेनं व सढळपणे, निव्वळ, आपल्या व्यक्तिगत स्वार्थासाठी आपले 'मेंदू' भांडवलशाहीच्या दरबारात बोली लावून सर्रास भाड्याने देताना, तो 'महात्मा' उघड्या अंगावरच्या चष्म्यातून उघड्या डोळ्याने पहात होता... आणि तेवढाच आंतरिक वेदनेनं व्यथित होत होता. म्हणून, म. गांधींनी 'स्वराज' ही 'प्रजासत्ताक-संकल्पना', केवळ, ब्रिटीश वसाहतीकरणाविरुद्धच मांडली नव्हती; तर, त्यात 'ब्रिटीश-भांडवलशाही'च्या अनिष्ट प्रभावातून झालेलं भारतीय समाजमानसाचं 'वसाहतीकरण'सुद्धा (काळ्या त्वचेचे भारतीय 'गोरे'...'Colonisation of Indian intellect') घासूनपुसून नष्ट करणं, त्यांना अभिप्रेत होतं... म्हणूनच, तर तो 'महात्मा'! कारण, ब्रिटीश भांडवलशाही-व्यवस्थेचे 'लाभार्थी' असलेली एतद्देशीय 'काळ्या त्वचे'ची उच्चमध्यमवर्गीय बुद्धिमंत, सुशिक्षित (तत्कालीन I.C.S. वगैरे सरकारी सेवेतील व खाजगी क्षेत्रातील इतर बुध्दिजिवी) मंडळींच तर, ब्रिटीश-शासन चालवत होती... आणि, त्यांची 'स्वराज' ही संकल्पना, स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच भारतात मूळ धरुन झपाट्याने विकसित होत चाललेल्या भांडवलशाहीवरचा व पर्यायाने या समस्त भांडवलदारवर्गावरचा फार मोठा 'मर्माघात' होता; ज्यामुळे, आतून ही बुद्धिमंत 'भांडवलदार मंडळी' नुसतीच संतापाने धगधगत नव्हती; तर, मनातून संतापाने साफ पेटली होती.**

आणि, त्यातूनच, हिंदी चित्रपटातल्या 'सलीम-जावेद' फेम डायलॉगप्रमाणे, खून की प्यासी झालेली ही सगळी स्वार्थी-लाभार्थी मंडळी.... प्रथम, गांधीहत्या कोणाच्या माथी मारता येईल (यासाठीच तर, नथ्थ्यानं 'मुस्लिम वेष' परिधान केला होता) आणि तो अश्लाघ्य प्रयत्न साफ फसला म्हणून, गांधी-हत्येपश्चात त्याचं 'निमित्त', जनसामान्यांच्या भावनेला हात घालून बेमालूमपणे कशातऱ्हेनं त्यांच्या समोर मांडता येईल, या कामाला 'संघ'टितपणे व योजनाबद्ध पद्धतीने लागली... त्यातूनच, पुढे जाऊन व्हाय आय किल्ड गांधीच्या आत्यंतिक घृणास्पद व उलट्या काळजाच्या मखलाशीला प्रारंभ झाला!

......हूं तो कर छूट जो, असा गीतेतला 'कर्मयोग' आयुष्यभर साधणारं हे महान ऋषितुल्य व्यक्तित्व, अखेरच्या क्षणी, हे राम म्हणत, 'राजयोगा'पर्यंतचा अमोघ प्रवास लिलया पार पाडतच ३० जानेवारी-१९४८च्या दुर्दैवी दिवशी अनंतात विलीन झालं!

....म्हणूनच तर, नथ्थूपंथीयांनी म. गांधींच्या देहाची चाळण करुनही 'विचाररुपी' गांधी काही केल्या 'मरायला' तयार नाही आणि कल्पांतीसुद्धा 'मरणार' नाही; उलट, हरघडी जाणाऱ्या प्रत्येक दिवसासोबत, त्या महात्म्याच्या विचारसरणीची आणि संदेशाची 'अनिवार्यता' जगाच्या ध्यानी येऊ लागलीय...

ज्याला, नथ्थूपंथीयांनी मारलं, 'तो गांधी' मेल्यानंतर तर, दिवसागणिक अधिकच मोठा होऊ लागलाय आणि सहन होत नाही व सांगताही येत नाही, असं ते, 'नथ्थूपंथीयां'च्या ऊरातलं फार मोठं शल्य बनून राह्यलंय!

.... ***राजन राजे*** (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)



# गोष्ट मायमराठी माणसाची...

...जेव्हा, प्रत्यक्षात शिवछत्रपतींनी हयातीत लहानमोठ्या मोजक्याच लढाया केल्या... आपल्या अल्प आयुष्याची महत्त्वाची वर्ष, त्यांनी कष्टपूर्वक स्वराज्याची व्यवस्थित न्यायनीतिपूर्ण घडी बसवण्यात व्यतित केली. तथाकथित हिंदुत्ववाद्यांनी आम्हाला, हाती नांगर धरलेले शिवछत्रपती, कधि शिकवलेच नाहीत, दाखवलेच नाहीत. त्यांचं, राजकारण त्यातून फळफळलं; पण, मराठी–पिढ्यापिढ्यांचं भविष्य कोळपून गेलं! आम्ही फक्त, 'शिवजयंत्या' साजऱ्या करण्यात मग्न राहीलो; पण, शिवछत्रपतींना प्रत्यक्ष व्यवहारात उतरवणं, त्या नादात आमच्याकडून राहून गेलं...त्यातून, पिढ्यापिढ्यांचं भयंकर नुकसान होतं गेलं; ज्याच्या मोजमापाची फुटपट्टी, गेल्या चारपाच पिढ्यांसह पुढील किती पिढ्यांना कवेत घेईल, याचा साधा अंदाज बांधणंही कठीण!

---

ज्या शिवछत्रपतींनी मोगलांच्या ताब्यात असलेल्या गुजराथच्या सुरतेवर एकदा नव्हे, दोनदा स्वारी केली...मराठी–मुलूख जाळूनपोळून उध्वस्त करणाऱ्या मोगलांना अद्दल घडवण्यासाठी, झाल्या नुकसानीची भरपाई करुन स्वराज्य पुनःउभारणीसाठी सूरत लुटली; तोच गुजराथ, आज एकप्रकारे त्या इतिहासाचा प्रतिशोध घेतोय... मराठी–मुलूखाचा, मराठी–संपदेचा ताबा घेतोय; पण, आम्ही अजूनही प्रस्थापित राजकारण्यांवरच विसंबून आहोत. कधि त्यातले प्रस्थापित 'सापनाथ' निवडतो, तर कधि 'नागनाथ'! डसतायत दोन्ही, मराठी–समाजपुरुषाच्या देहात विष चढतंय दोन्हींचं; पण, तरी मराठी–माणूस बेभान आहे, राजकीय–जागृती त्याच्या अंतरी अवतरायला–उतरायला तयार नाही. शिवछत्रपतींना जन्माला घालायला, या महाराष्ट्राने तब्बल हजार वर्ष घेतलीत, हे विसरुन चालेल?

---

मांजरांच्या पिल्लांचे डोळे २१ दिवसानंतर उघडतात; पण, शिवछत्रपती आम्हाला एकदा जागे करुन आमच्यातून निघून गेल्यानंतर... पुन्हा आम्ही जे निद्रिस्त झालो; ते शिवछत्रपतींनंतरच्या २१ पिढ्या उलटून गेल्या तरी, आमचे डोळे उघडायलाच तयार नाहीत, या मराठी–दुर्दैवाला काय म्हणावं? इथून पुढे महाराष्ट्र, हा मूळ मायमराठी–माणसांसाठी नव्हे; तर, पूर्णतया गुजराथी–भाषिकांच्या अर्थकारणासाठी आणि राजकारणासाठी राबेल. गळ्यात पट्टे अडकवून श्वानांना फिरवलं जातं; तसंच, मराठी–राजकारणी, या गुजराथी–भांडवलदारवर्गाचे पट्टे, स्वतःहून गळ्यात अडकवून घेत तुमच्यासमोर मतांचा जोगवा, मतांची भीक मागत फिरत रहातील. फक्त, प्रश्न एवढाच उरेल की,नक्की भीक कोण मागतोय? निवडणुकीसाठी उभे असलेले की, मतदानासाठी रांगा लावून उभे असलेले?

---

तुटपुंज्या पगाराच्या 'असुरक्षित' कंत्राटी–नोकऱ्यांसाठी, स्वाभिमान गहाण टाकत मराठी–तरुण जीव पाखडत रहातो. अर्धरोजगारीचाच नव्हे; तर, अल्परोजगारीचा शाप भोगत... फडतूस 'कंत्राटी–नोकऱ्यां'तून आपली बेरोजगारी हटल्याचं 'भिकारपण' पदरी बांधत, आमचा 'मराठी–गुलाम' टाचा झिजवत फिरत रहातो. निवडणुकीत प्रचार करताना मिळणाऱ्या दिडक्या, फुकटचं खानपान... यासाठी, लाळ घोटत मराठी–तरुणाईची अवघी मांदियाळी, नेत्यांभोवती फेर धरुन त्यांनी फेकलेल्या तुकड्यांच्या तालावर नाचताना–थिरकताना दिसत रहाते... मग, खरे भिकारी कोण? औटघटकेसाठी मतांची भीक मागून, उर्वरित पाच वर्षांत मालामाल होत, पन्नास पिढ्यांची तरतूद करणारा की, औटघटकेसाठी फुकटची कमाई–खानपान करुन उर्वरित पाच वर्षच काय, तहहयात भीक मागत फिरणारा?

---

अनुभवजन्य वस्तुस्थिती (Empirical Circumstances) तुमच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालत दाखवून देईल की, महाराष्ट्रातली परप्रांतीय–नेतेमंडळी, स्थानिक मराठी–माणसांची व्यवहारात फसवणूक करण्यात आपल्या समाजबांधवांना साथ, उत्तेजन देत रहातात...कायमच, नीतिविना व्यापार–उद्योगाचं महापातक करत रहातात; पण, आपल्याच समाजातल्या कुणाशीही बेईमानी केल्यास, त्यांना गुजराथी–समाजाकडून कडक शिक्षा म्हणून प्रसंगी, सगळ्या समाज–व्यवहारातून बाद–बहिष्कृत केलं जातं. याउलट, आमचे मराठी–नेते, कायम आपल्याच हाडामांसाच्या मराठी–माणसांना फसवून, गुजराथी–भाषिक भांडवलदारांचे खिसे भरतात...निर्लज्जपणे त्यातली आपली टक्केवारी ओरपत रहातात. बरं, हा मोठा प्रज्ञापराध करताना जीभेवर उच्चारण मात्र असतं अचूक, जय शिवाजी किंवा जय भीम!

---

आत्यंतिक स्वार्थपोटी, ही नीतिशून्य मराठी–राजकीय मंडळी, घरच्याला लाथा आणि दारच्याला पायघड्या घालताना दिसतील...कंपन्या–कारखान्यांमधून 'कंत्राटी–कामगार पद्धती'ची ठेकेदारी करुन आपल्याच जमातीच्या श्रमिक–तरुणाईचं रक्तघाम अमानुषपणे शोषून घेणारे, भांडवलदारांच्या समृद्धीचे इमले उंचचउंच अस्मानात चढवताना दिसतील. शिवाय, अशाच विविध कंत्राटी–व्यवहारांमधील बिनश्रमाच्या टक्केवारीतून मिळालेल्या पापी गुजराथी–पैशातूनच... मराठी–टाळूवरचं लोणी खाणारी ही राजकीय–नेतेमंडळी, भोळसट मराठ्यांना फाजिल–उत्सवप्रियतेच्या नादी लावताना दिसतील. पोटाच्या, शिक्षण–आरोग्याच्या मूलभूत प्रश्नांवरुन दिशाभूल करण्याच्या, या अशा पैशाचिक व पिशाचिक व्यवहारांमुळेच मराठी–माणसांमध्ये राजकीय–जागृती येणं, फार फार कठीण झालंय!

---

मराठी–नवराबायको दोन्ही कमावण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर तर आहेतच; पण, तुटपुंज्या 'डबल–इंजिन' कमाईतही, महागड्या होत चाललेल्या शहरं–उपनगरांतून गुजराण करणं मराठ्यांना कठीण होत चाललंय. त्यामुळे, निवृत्ती व साठीनंतर विश्राम वगैरे प्रकार त्यांच्या नशिबी नाहीतच... तहहयात, हातपाय चालेपर्यंत पोटासाठी काहीना काही धडपड करतच रहायचंच त्यांनी! धनदांडग्या परप्रांतीयांच्या धिप्पाड बायका, जेव्हा सोशलक्लबमध्ये ऐशोआराम, जंगी पार्ट्या करत असतात...तेव्हा, आमच्या बारीक चणीच्या, 'चिपाड' देहाच्या मराठी–तरुणी (ज्यांना, मातृत्व झेपेल कसं आणि जन्माला घातलेल्या मुलांचं वजन असेल किती...हामोठा प्रश्नच) कुठल्यातरी कोंदट कार्यालयात, हॉटेल–मॉटेल, मॉलटॉल, हॉस्पिटलमध्ये दहाबारा–पंधरा हजारात राबत असतात.

---

*पक्षांतर बंदी कायद्यातील कलम १–ब चे उदाहरण देताना सरोदे यांनी विधीमंडळ पक्ष आणि कलम १–क नुसार राजकीय पक्षाच्या व्याख्या काय आहेत? याची माहिती दिली. विधिमंडळ पक्षाचं आयुष्य ५ वर्षांचं असतं. त्यामुळे ती अस्थायी स्वरुपाची व्यवस्था आहे. म्हणूनच, कायद्यात विधिमंडळ पक्षाला महत्त्व नाही. मूळ राजकीय पक्षाला महत्त्व आहे. इथे मूळ राजकीय पक्ष शिवसेना आहे, बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेला आहे ...इति, **असीम सरोदे***

**राहुल नार्वेकरांनी तेव्हा राजीनामा दिलाच नाही, असीम सरोदेंनी ठेवलं 'या' मुद्द्यावर बोट!**




**राज्यपाल फालतू माणूस**

सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीबाबत बोलत असताना सरोदे यांनी, न्यायाधीशांनी राज्यपालांबाबत केलेल्या एका टिप्पणीची आठवण करून दिली. राज्यपालांनी या राज्यातील सरकार उलथवून लावण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली, अशा शब्दात घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्तीवर सर्वोच्च न्यायालयाने कडक ताशेरे ओढले होते. याबद्दल असीम सरोदे यांनी, माजी राज्यपालांना फालतू माणूस म्हटले. त्यावेळी, महाराष्ट्रात भगत सिंह कोश्यारी राज्यपाल पदावर होते.

# बिल्कीस बानो आणि अयोध्येतलं राममंदिर...

**''बिल्कीस बानो, प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या सणसणीत निकालाने... ब्रिजभूषणसिंग, कुलदीपसिंग सेंगर, संदीपसिंग सैनी यासारख्या अनेक बलात्कारी किंवा लैंगिक-अपराधी आमदार-खासदार-मंत्र्यांनी खच्चून भरलेल्या; तरीही, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अशा दांभिक घोषणा तारस्वरात देणाऱ्या आणि 'मुँह में राम, बगल में छुरी' पॅटर्न राबवत अयोध्येत 'राममंदिर' बांधू पहाणाऱ्या... भाजपाई डबल-इंजिन सरकारांचं जागतिकस्तरावर, असं काही 'वस्त्रहरण' अमृतकाळात झालंय की, जे गेल्या सातआठ दशकात, कधि कुठल्या सरकारचं झालं नव्हतं! तेव्हा, या नैतिकदृष्ट्या नागव्या झालेल्या 'डबल-इंजिन' सरकारांच्या, किमान गृहमंत्र्यांनी तरी तत्काळ राजीनामा देऊन तोंड काळं करत सत्तेवरुन पायउतार व्हायला पाहीजे (अर्थातच, 'जनात नाहीतर मनात तरी'...यत्किंचितही, लाजलज्जा-शरम शिल्लक असेल तरच)...!!!''**

...आधी, ईडी-आयटी-सीबीआय व करोडोंच्या 'खोक्यां'करवी 'फोडोफोडी'साठीचा व विरोधी-सरकारे 'पाडापाडी'साठीचा 'भाजपाई-प्रयोग' यथासांग पार पडला; तो 'दंड, भेद, साम, दामा'चा आणि आता, सुरु झालाय तो निवडणुका जिंकण्यासाठी प्रयोग 'जय श्रीरामा'चा! पण, भाजपाच्या दुर्दैवाने आणि समस्त न्यायप्रेमी सुजाण भारतीय नागरिकांच्या सुदैवाने...'प्रथमग्रासे मक्षिकापातः' म्हणून 'बिल्कीस बानो' प्रकरणाचा सर्वोच्च-निर्णय दत्त म्हणत, या भाजपाई-प्रयोगाच्या मार्गात उभा ठाकलाय!

**...तळागाळातील जिवंत हाडामांसाच्या माणसांना लाथाडत, दगडाधोंड्यांना शेंदूर फासत देव म्हणून पूजणारं, अयोध्येत ऐश्वर्यसंपन्न अवाढव्य राममंदिर बांधणारं (अर्थातच, बहुशः ग्राहक आणि श्रमिकांच्या लुटीच्या व सरकारी-महसूल बुडवलेल्या भांडवलदारवर्गाच्या 'काळ्या पैशा'तूनच)... ''संघीय-भाजपाई 'हिंदुत्व', हे 'रामा'शी कमी आणि 'रावणा'शी जास्त नातं सांगणारं आहे''!**

रावणही ऐश्वर्यसंपन्न होता (त्याची लंकाच मुळी सोन्यानं मढवलेली होती, त्यामानाने आमच्या प्रातःस्मरणीय रामाची अयोध्या ऐश्वर्यसंपन्नतेच्या दृष्टीने किरकोळच म्हणावी... पण, सत्य, न्यायनीति, प्रेमभावामुळे अयोध्या विश्ववंदनीय होती), रावण विद्वान होता, व्यासंगी होता, सगळी पोथ्यापुराणं-शास्त्रं पालथं घातलेला होता; पण, अंतरी प्रेम-वात्सल्य, न्यायनीति, सत्य...या महत्तम जीवनमुल्यांना पारखा झालेला होता. त्यातूनच आसुरी इच्छा आणि राक्षसी महत्त्वाकांक्षांचा प्रादुर्भाव त्याच्याठायी झालेला होता. परस्त्री-प्राप्ति आणि सत्ता-ऐश्वर्य संपादन करण्यासाठी कसलाही विधिनिषेध न पाळता, कुठल्याही थराला जाणारी विकारी-गुन्हेगारी मानसिकता आणि सर्वांना जाळूनपोळून काढणारा, संत्रस्त-त्राही त्राही करुन सोडणारा अहंकार, त्याच्यात होता. दुसऱ्यांची सुंदर पत्नी तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने पळवून आणणं काय किंवा आपल्या प्रेमळ पत्नीला तहहयात क्रूरपणे साफ लाथाडणं काय... तत्त्वतः, त्यात फारसा फरक नाहीच!

...जरी रावण त्यामुळे 'वध्य' ठरुन गेला होता, कठोर दंडासाठी पात्र ठरला होता; तरीही रावण, हा सत्ताधारी 'लंकाधिपती, लंकेचा शासक' असल्यामुळेच त्याच्या घनघोर अपराधांना शासन होणं, दंड होणं शक्य होत नव्हतं... नियतीनं अखेर ती जबाबदारी रामावर टाकली एवढंच! आता, वर्ष २०२४ मध्ये, 'रावणा'पेक्षाही हीन-पातकी, अवतारी-अत्याचारी भाजपाच्या राजकीय निःपाताची पुण्यप्रद जबाबदारी, समस्त भारतीय मतदारांवर नियतीनं टाकलीय, हाच काय तो आजच्या स्थितीतला फरक.

**गौतम बुद्धही 'प्रबुद्ध' होण्यापूर्वी, राजकुमार 'सिद्धार्थ' असताना आपल्या पत्नीला, यशोधरेला व पूत्र राहुलला एकाकी सोडून गेले होते... हा वरकरणी अपराध खरा; पण, दुःखी जगाच्या उद्धारार्थ 'अंतिम-सत्य' शोधण्यासाठी झालेला तो अपराध, अपराध न रहाता (त्याबद्दल, जवळपास एका तपानंतर स्वतः गौतम बुद्ध यशोधरेला एकप्रकारे क्षमायाचना म्हणा वा सांत्वन करण्यासाठी म्हणा...पण, भेटायला गेले होते आणि त्या भेटीची परिणती यशोधरा आणि राहुल, दोघंही त्यांच्या पंथात सामील होण्यात झाली होती) तो वैयक्तिक-स्वरुपाचा विश्ववंदनीय असा, उच्चतम त्याग बनून गेला. गौतमाचा पत्नीचा त्याग; जनतेला धर्मविद्वेषाच्या अंधःकारात ढकलण्यासाठी नव्हता... नव्हता तो, तळागाळातल्या जनतेवर क्रूरपणे दडपशाही लादून, त्यांना लुटत... आपल्या मित्रपरिवारातल्या मोजक्या भांडवलदारांची** (Crony-Capitalists) **मत्ता-उन्मत्तता बेलगाम-बेफाम वाढवण्यासाठी! तो गौतमाचा त्याग होता, जगत-कल्याणासाठी... जगात प्रज्ञा, शील, करुणा यासारख्या महन्मंगल जीवनमुल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी, दुःख दूर सारुन मानवी-जगण्यात शाश्वत सुखशांति आणण्यासाठी!!**



थोडं इतिहासात डोकावून पाहीलं; तर, रामदासांनी 'रामदासी पंथ' स्थापन करताना, उत्तर भारतीय रामाचं प्रस्थ महाराष्ट्रात निर्माण केलं! त्याअगोदरच्या, संत ज्ञानेश्वरांपासून ते नंतरच्या थेट संत गाडगेबाबापर्यंत आपले सगळेच मायमराठी संतमहंत, हे आपल्या महाराष्ट्रातलीच महाराष्ट्रीय दैवतं, प्रामुख्याने भजत-पूजत होते. शिवछत्रपतींनी कधि कुठलं 'मोठं राममंदिर' बांधल्याचं किंवा रामाचं मोठेपण, महाराष्ट्रीय दैवतांवर लादल्याचं तुम्हाला अंशानेही कुठे आढळणार नाही. आमचं हाडामांसाचं आराध्य दैवत असलेले शिवछत्रपती, स्वतः ज्या दैवतांची पूजा करत होते... ती होती तुळजापूरची भवानी, तो होता पंढरपूरचा विठोबा आणि रखमाई व प्रतापगडावरचा शिवशंभो!

दुसरी बाब म्हणजे, राम हा तर तसा क्षत्रियच राजा, त्यामुळे तो शाकाहारी होता की, मांसाहारी... हा प्रश्नच गैरलागू आहे. त्यातून, जर कुणाला मांसाहार करणारे म्हणजे वाईट आणि शाकाहारी म्हणजे चांगले गुणी... असं सुचवायचं असेल; तर, त्या महामूर्खांनी प्रथम हे ध्यानात घ्यावं की, करोडो लोकांची नृशंस हत्या घडवणारे हिटलरसारखे अनेक क्रूरकर्मा, हे शाकाहारीच होते! आपल्याकडच्या डाळभात खाणाऱ्या, व्यापार-उद्योग करणाऱ्या तद्दन 'शाकाहारी' गुजराथी-भाषिक जमाती... श्रमिकांचं किंवा ग्राहकांचं आर्थिक-शोषण करताना, कुठल्या थराची असंवेदनशीलता, छुपी हिंस्रता दाखवतात; ते आपण व्यवहारात पिढ्यानपिढ्या पहात आलेलो आहोतच... हातच्या कंकणाला आरसा कशाला?

मात्र, इथे एक गोष्ट प्रकर्षाने ध्यानात घेतली पाहीजे; ती म्हणजे विष्णुचा एकमेव परिपूर्ण अवतार असलेला कृष्ण, गवळी (यादव) म्हणजेच, आजच्या परिभाषेत 'ओबीसी' होता... त्यामुळेच तर त्याचा प्राधान्यक्रम, संघ-भाजपाई लोकांकडून, रामाच्या खाली ढकलण्यात आलेला नाही ना? ...की, अर्जुनाच्या रथाच्या घोड्यांना खरारा करणारा, गोकुळातील गोपगोपिकांना मुरलीची भुरळ घालणारा आणि आपल्या गीतेतून पातकी अत्याचाऱ्यांच्या छातीत धडकी भरवणारा अमोघ-अचूक 'कर्मसिद्धांत' मांडणारा श्रीकृष्ण... त्यांना खऱ्याअर्थाने झेपणारा नाही??

**रामासह विष्णुच्या अपूर्ण अवतारांपैकी एक असलेलं व हाती सदैव परशू असलेलं परशुराम, हे आपलं एकमेव ज्ञात दैवत 'वर्णवर्चस्ववादी' जातीचं आणि ते अत्यंत रौद्ररुपाचं, रागीट, शीघ्रकोपी, अविचारी आणि क्षत्रियांचा २१ वेळा संहार करणारं... म्हणूनच तर, 'जय सीताराम किंवा जय सियाराम', या वात्सल्यपूर्ण-प्रेमळ संबोधनामधल्या 'सीता माऊली'ला दूर सारुन संघ-भाजपाई लोकांनी जाणिवपूर्वक, हाती रामबाण घेऊन 'कोदण्डा'ची प्रत्यंचा व भुवया ताणलेला युद्धसन्मुख राम जनमानसावर बिंबवण्यासाठीच 'श्रीराम', हे उग्र-रागीट संबोधन निवडलेलं नसावं ना??**

इथे, जाणिवपूर्वक दि. ६ एप्रिल-२०२३ रोजी, 'धर्मराज्य पक्षा'ने प्रसारित केलेला संदेश उद्धृत करणं अगत्याचं ठरावं... तुमच्या शोषण-अन्याय-अत्याचारांनी बरबटलेल्या काळ्या हातांनी, कारस्थानी-कलुषित काळ्या मनांनी (कुणाच्या टोपीच्या रंगाशी आम्हाला देणंघेणं नाही)... तुम्ही लोकं, अयोध्येत बांधत असलेल्या 'राममंदिरा'तला राम कधिही कुणाला पावणं, केवळ अशक्यच होय... राम पावायचाच झाला; तर, नाशिकच्या 'काळाराम-मंदिरात'ला पावेल; कारण, दलितांच्या प्रवेशासाठी ऐतिहासिक आंदोलन करुन तिथल्या रामाशी न्यायाची, समरसतेची रुजवात आमच्या बाबासाहेबाने करुन ठेवलीय, म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर प्रसन्न होऊन तो 'राम' सदैव तिथे जागृत स्वरुपात आहे... कितीही प्राणप्रतिष्ठेचे भव्यदिव्य...(पान क्र. १२ वर)

# बेफाम जनसंख्या आणि चंगळवादी जीवनशैली रोखणे

**दोनपेक्षा अधिक, जन्माला येणारं 'मूल'... खरंतरं, देशातल्या अनेक समस्यांचं 'मूळ'! त्यामुळेच, केवळ, जल, जंगल व जमीन यांची सुरक्षाच नव्हे; तर, जनसंख्या आणि जीवनशैली रोखणं.... ही सुध्दा, काळाची तातडीची गरज असतानाच, भारतानं १४० कोटी लोकसंख्येचा टप्पा ओलांडण्याचा अक्षम्य 'निसर्गापराध' केलाय !!!**

विविध सजीवांच्या जाती-प्रजाती, 'सूर्याच्या स्थिरांका'च्या सिद्धांतानुसार (Solar-Constant), विवक्षित प्रमाणात, ईश्वरी-संकेतानुसार निमूटपणे जीवनक्रम निभावत असताना... आपली 'संख्या' निसर्ग-संकेताविरुद्ध आजवर बेलगाम वाढवत नेत, मानवानं पृथ्वीवरच्या 'जगण्या'चा अवघा समतोलच ढासळवून टाकलाय!

**आम्ही, आमच्या बेफाम गतीने वाढत्या लोकसंख्येला आवर घालणार नाही... आमच्या, अंति विनाशकारी 'चंगळवादी' जीवनशैलीला रोखणार नाही... पण, आपल्याच कर्माने (शहरीकरण, औद्योगिकीकरण, खाणकाम इ. साठी जंगलं वगैरे उध्वस्त करत), आपल्या जगण्यात जराही कुठल्या प्राणीपक्ष्यांची अडचण झाली की, मुक्या प्राण्यांना संपवायला, गोळ्या घालायला मोकळे होणार. आम्ही सगळे 'निसर्ग-नियम' तोडत बेबंद जगणार... आधुनिक संसाधनांनीयुक्त झाल्यानं, आपल्याच बापाचा, हा 'पृथ्वी' नामक ग्रह आहे व अन्य कुठल्याही सजीवाचा तिच्यावर कुठलाही हक्क नाही... अशी भीषण मस्ती, मानवी-रक्तात भिनवून पृथ्वीभर नाचणार... अरे व्वा मानवा!**

त्यामुळेच, निव्वळ जीव जगवण्यासाठी दिवसाचे चोवीस तास, वर्षाचे बारा महिने दाही दिशांना नुसत पळणं, अखंड पळत रहाणं... मानवेतर सजीवांच्या नशिबी आलंय! हे सगळं नेमकं काय चाललय, कशासाठी चाललय.... याचं आकलन होणंही, या अश्राप जीवांना कालत्रयी अशक्यच! ईश्वरीप्रेरणेनुसार चालणारे 'कर्मबंधनमुक्त' मानवेतर सजीव, सर्वत्र मोठ्याप्रमाणावर हरघडी धाराशायी पडतायत... कित्येक प्रजाती तर, पृथ्वीवरुन कायमच्या अस्तंगत होतायत... त्या कधि भुकेमुळं, कधि सर्रास हत्यासत्रामुळं, तर कधि आपली आश्रयस्थानं उध्वस्त झाल्यामुळं!! त्यात, ईश्वरीअंश असलेले व निव्वळ आपल्या अस्तित्वासाठी झगडणारे वनस्पती, जलचर, उभयचर, कीटक, पशूपक्षी सारेच सजीव समाविष्ट झालेत.... उद्या अशीच लोकसंख्या भारतात आणि जगभर बेफाम वाढत राहीली आणि 'कार्बनकेंद्री जीवनशैली' अशीच फोफावत राहीली... तर, तर, इतर प्राण्यांसारखीच मनुष्यप्राण्यावरही, तिचं दुर्दैवी वेळ 'जागतिक-तापमानवाढी'तून उद्भवलेल्या पर्यावरणीय महासंकटांमुळे येईलच!

म्हणूनच, सांप्रतकाळी, 'कार्बन व प्रदूषणकेंद्री' संवेदनशून्य चैनबाजीत जगण्याचा एक अमानुष व सैतानीउन्माद, जगभरात जवळपास सर्वच मानवी समूहात संचारलेला पहाताना... त्या, आधुनिक मानवाला, मानव म्हणायचं की,



हा पृथ्वीवरचा नवा सैतान???

परिस्थिती हाताबाहेर जाण्याअगोदरच, मुलाबाळा-नातवंडांवर आपलं खरंखुरं प्रेम असेल; तर, .... आपल्या जीवनशैलीत, अर्थव्यवस्थेत, विकास-प्रक्रियेत युध्दपातळीवरुन 'निसर्ग-पर्यावरणपूरक' आमूलाग्र बदल करण्याची नितांत गरज आहे! त्यामुळे, जातधर्म, पंथ-प्रांत, कौटुंबिक आर्थिक-गरज वगैरे सबबींखाली 'लोकसंख्या' वाढवत सुटलेल्यांना अत्यंत कठोरपणे आवर घालावाच लागेल!

...या निमित्ताने, युरोप-अमेरिकेत मेक्सिको-अरब-आफ्रिकेतल्या लोंढ्यांनी जो धुमाकूळ घालून यक्षप्रश्न उपस्थित केलाय, त्याचाही, धांडोळा घ्यावा लागेल. बेताल-बेबंद वागण्यानं लोकसंख्येचा भयानक फुगवटा, जगात जिथे जिथे म्हणून झालेला आहे... तिथून, भविष्यात हे लोंढे आक्रमक बनत शेजारच्या, बऱ्यापैकी स्वयंशिस्तीनं लोकसंख्येला आवर घालणाऱ्या, देशांवर आदळणार आहेतच (जसे, 'महाराष्ट्र' नावाच्या 'शिवबा-संतां'च्या देशात, उत्तर भारतीय आक्रमकांचे लोंढे दीर्घकाळ थडकतायत).

**उद्या बांगलादेश, नेपाळ, म्यानमार, पाकिस्तान, अफगाणिस्तान येथील, निव्वळ आपल्या कर्माने, उपासमारीने मरणारे मानवी लोंढे भारतात येऊन आदळतील (आजच, ती समस्या याअगोरच उग्र बनलेली आहेच). मग, त्यांना दया दाखविण्यासाठी आम्ही पृथ्वीवरची उरलीसुरली वनसंपदा व नैसर्गिक संसाधनं सफाचट करुन टाकणार आहोत काय? या निर्वासितांच्या लोंढ्यांना, दया दाखवायचीच असेल तर, ....कुठल्याही परिस्थितीत, त्यांच्यापैकी संबंधित प्रत्येकाचा.... कायदेमंडळात कायदा संमत करत, मुले जन्माला घालण्याचा अधिकार रद्द करुनच ती दाखवली जायला हवी. या अटीवरच मग खुशाल, अशा लोंढ्यांना माणुसकी दाखवा; पण, लहान मूल (अर्थात ते मोठं झाल्यावर) असो वा तरुण-वृद्ध.... निर्वासितांपैकी कुणालाही, भविष्यात पुढे, आश्रय देणाऱ्या परक्या देशात, मुले जन्माला घालण्याचा अधिकार कायमचा ठोकरुनच (प्रसंगी, यथोचित काळ पाहून, कुटुंबनियोजन-शस्त्रक्रिया करुन), ती दाखवली जायला हवी आणि विशेष म्हणजे, त्यात कुठलंही शारिरीक पातळीवरील क्रौर्य घडत नाहीय..... अन्यथा, हे मान्य नसेल तर, बिलकूल दया दाखवली जाऊ नयेच!**

...नाहीतर, सगळ्याच जंगली सजीवांना, ही अक्राळविक्राळ वाढणारी मानवी प्रजावळ जगवण्यासाठी संपवावं लागेल.... आणि, मग वादळं, दुष्काळ, ढगफुटी, गारपीट, असह्य उष्णतामान, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, ज्वालामुखींचे उद्रेक, प्रलयकारी भूकंप, तीव्र हिमपात यासह, भीषण संसर्गजन्य रोगराई व कर्करोगासारखे असाध्य रोग पसरवत, नियती पृथ्वीभर मानवी-संहाराचं थैमान घालेल... तीन वर्षांपूर्वी, यवतमाळ वाघिणीच्या 'शार्पशूटर'सह व तसे आदेश देणाऱ्यांसह, इतर साऱ्या 'निसर्गभक्षक' मानवी-अस्तित्वाची तिरडी बांधली जाणं, मग, किती दूर असेल ???

***.... राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष... भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणवादी हरित पक्ष)

## बिल्कीस बानो आणि अयोध्येतलं राममंदिर... *...(पान क्र. ११ वरुन)*

सोहळे मंत्रोच्चारात पार पाडलेत...तरी, अयोध्येतल्या शाही-राममंदिरात रामाची फक्त निर्जीव मूर्ति असेल... पण, रामाचे पंचप्राण, रामाचा आत्मा; अशा 'काळाराम'सारख्या मंदिरात पददलितांना-शोषितांना, अन्याय-अत्याचारग्रस्तांना लढ्याची प्रेरणा देत, तिथेच वास करुन असेल!

अयोध्येतल्या रामाच्या 'निर्जीव मूर्ति'ने निवडणुकीत कदाचित विजय मिळवता येऊ शकेल... पण, तुमच्या विजयात भारतीय जनतेचा दारुण पराभव दडलेला असेल आणि भविष्यातल्या भारतातल्या 'रामराज्या'च्या संभाव्य शक्यतेचा तो करुण अंत असेल!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

*(ता. क. : ''राम म्हणू राम, नाही सीतेच्या तोलाचा हिरकणी सीतामाई, राम 'हलक्या' दिलाचा''...अशी 'हलक्या दिला'चा म्हणूनच जर आपल्या लोकवाङ्मयाने, लोकभावनेनं साक्षात रामाची संभावना केली असेल; तर, या पातकी भाजपाई-अंधभक्तांना आपण 'कुठल्या दिला'चं म्हणावं...???)*

# हिंदू असण्याबद्दल कुणाला अभिमानच नव्हे; तर, अगदी थेट गर्व वगैरे वाटतं असेल... तर, खुशाल वाटू द्या; पण, जरा सावधान!


**लाल चीनला तहहयात शिव्याशाप देणं, देत रहाणं... इथपर्यंत ठीकच; पण, कम्युनिस्ट लाल चीन आता, आर्थिक-प्रगति सर्वांची** (Common-Prosperity) **या महान आर्थिक-तत्त्वाला कठोरपणे राबवत, गरीब-श्रीमंतांमध्ये निर्माण झालेली मोठी दरी साफ हटवतोय, आर्थिक-विषमता दूर करतोय... त्याकडे, मात्र, सोयिस्कर दुर्लक्ष करायचं आणि भांडवल'शहां'च्या हिताचं राजकारण-अर्थकारण करत, देशात महाभयानक व अमानुष स्वरुपाची 'आर्थिक-विषमता' वाढवत न्यायची .... हे म्हणजे, 'हिंदुत्व' नव्हेच!**

इथे एक गोष्ट ध्यानात घेणं आवश्यक आहे की, सध्या १७ Sustainable Development Goals पैकी, सर्वात महत्त्वपूर्ण म्हणून, युनोनेही स्विकृत केलेल्या आर्थिक-प्रगति सर्वांची (Common-Prosperity) धोरणाचा 'धर्मराज्य पक्ष'च फक्त एकमेव, स्थापनेपासूनच जोरदार आग्रह धरत आलेला आहे!

**शेतकऱ्यांवर काळे कायदे जबरदस्तीने लादून व कामगारांचे 'कंत्राटीकरण' करुन; तसेच, नवे काळे कामगार-कायदे आणून.... तळागाळातील या संपूर्ण श्रमिकवर्गाला 'गुलाम' बनवणं आणि पिढ्या न् पिढ्या त्यांच्या अमानुष शोषणाची बेमालूम 'व्यवस्था' निर्माण करणं.... म्हणजे, जाज्वल्य 'हिंदुत्वा'ची चिता पेटवणं होय (कारण, ज्या 'रामराज्या'चा तथाकथित 'हिंदुत्ववाद्यां'कडून सतत जयघोष केला जातो, तिथे असल्या अमानुष बाबींना थारा कधि नव्हताच... विशेष म्हणजे, १४ वर्षांच्या वनवासातून अयोध्येत पाऊल टाकताच रामाने, भरताला प्रश्न केला होता की, आपल्या राज्यातल्या सेवकवर्गाला समाधानकारक वेतनसुविधा दिल्या जातायतं की, नाही?... तेव्हा, प्रश्न असा की, नुसतचं 'राममंदिर' उभारणं महत्त्वाचं की, रामाचा 'रामराज्या'चा जीवनसंदेश राबवणं, महत्त्वाचं??)!**

पुराण कथनानुसार, शंकराच्या जटेतून निर्माण झालेल्या जीवनदायी गंगेला जागोजागी अडवून वेडीवाकडी धरणे बांधत सुटणं आणि त्या गंगामातेला मृतप्राय करत जाणं... गंगा-यमुनेला भयंकर प्रदुषित करणारी कारखानदारी व शहरीकरण वाढवत नेणं.... म्हणजे, 'हिंदुत्व' मुळीच नव्हे; उलट, ते जाज्वल्य हिंदुत्वाच्या मुळावरच उठणं आहे!

**नमामि गंगे तसेच, माँ गंगा मैय्याने मुझे बुलाया है.... असं फक्त, तोंडी म्हणायचं आणि भांडवलदारांच्या भल्यासाठी गंगामातेला बेलाशक मैली करत जायचं, तिच्या अस्तित्वाच्या मुळावर उठायचं....** आणि उलट, ही अशी गंगा, भागिरथी, यमुनेसारख्या नद्यांची करुण अवस्था पाहून तिच्या रुक्षणासाठी म. गांधींच्या मार्गाने जीवावर उदार होऊन लढणार्या स्वामी स्वामी निगमानंद, स्वामी ज्ञानस्वरुप सानंद, स्वामी गोपालदास यासारख्या डझनावरी खऱ्याखुऱ्या जाज्वल्य संतांचे बळी घ्यायचे.... आणि, खरंखोटं आध्यात्मिक-शिबिर उभारताना यमुनातिरावरचं पर्यावरण उध्वस्त करणार्या बनावट, ढोंगी संतांना मात्र, मतं मिळवण्यासाठी कुशीत घ्यायचं.... हे म्हणजे, 'हिंदुत्व' तर, नव्हेच; उलटपक्षी, ते 'हिंदुत्वा'चा दिवसाढवळ्या मुडदा पाडणं, होय!




जैवबहुविधतेनं नटलेल्या निसर्गसंपन्न डोंगरांचा, जंगलांचा कोथळा काढत... वनस्पती-कीटकपक्षी-प्राणीमात्रांच्या जीवावर उठणारं 'खाणकाम' करणं; म्हणजे, 'हिंदुत्वा'च्या दृष्टीकोनातून संवेदनाशून्य, क्रौर्यपूर्ण 'अधार्मिक' वर्तन होय'.... कारण, जगा, जगवा आणि जगू द्या असा संदेश देणारं... वृक्षवल्ली, प्राणीमात्रांना सणावारी (महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर... बैलपोळा, तुळशीविवाह, वटपौर्णिमा, नागपंचमी इ. इ.) पूज्य मानणारं 'हिंदुत्व', सर्व प्राणिमात्रांप्रति, जीवजंतूंप्रति करुणा-संवेदना बाळगायला शिकवतं... निसर्ग-पर्यावरणाचं संरक्षण-संवर्धन करायला शिकवतं... खरंखुरं हिंदुत्व, आपल्यात चराचर सृष्टीसह ब्रह्मांडालाही प्रेमानं, मायेनं सामावून घेतं!!

Glasgow COP26 **परिषदेत 'कार्बन-ऊत्सर्जन' रोखण्याबाबत राणाभीमदेवी थाटात भारतातर्फे प्रतिपादन केलं जात असतानाच, रामाच्या अयोध्येत गोरगरीबांच्या पणत्यांतलं तेल ओरपून, लाखो, करोडो पणत्या पेटवण्याचा 'प्रदूषणकारी' महामूर्खपणा करणं... म्हणजे, मूलभूत 'हिंदुत्व' संकल्पनेच्या गळ्याला नख लावणं!**

शतकातला सर्वात मोठा घोटाळा आणि सत्तेच्या संवेदनाशून्य उन्मादातून उद्भवलेला शेखमहंमदी महामूर्खपणा म्हणून, गणली गेलेली नोटबंदी (आज त्याला ५ वर्ष पूर्ण झाली तरी, त्या धक्क्यातून संपूर्ण भारत देश, अजूनही सावरलेला नाही) किंवा घिसाडघाईने अविचाराने लादलेली 'जीएसटी'(GST) अथवा सत्तेच्या मस्तीतून 'राफेल'चा दडपून टाकलेला घोटाळा... म्हणजे, 'हिंदुत्व' मुळीच नव्हे!

देशाची सगळी साधनसंपत्ती विकून देशभरातील बँका, सरकारी उपक्रम यांच्या 'खाजगीकरणा'चा बकासुर-नरकासुर निर्माण करत... जनतेला दे माय, धरणी ठाय करुन सोडणं... म्हणजे, 'हिंदुत्व' नव्हे; तर, ती म्हणजे, आपल्या राक्षसी स्वार्थापोटी मूठभरांचंच चांगभलं पहाणारी मूठभरांची 'विकृती' होय!

**पेट्रोल-डिझेल, स्वयंपाकाचा गॅस भयंकर महाग करुन महागाईचा भस्मासूर उभा करणं आणि जनतेचं साधं जगणं मुश्किल करणं... म्हणजे, 'हिंदुत्व' मुळीच नव्हे!**


तळागाळातल्या लोकांचे अनन्वित हाल करणारं आणि डझनावरी गोरगरीब मजुरांचे बळी घेणारं, पूर्व सूचना व पूर्व तयारीविना केलं गेलेलं बेजबाबदार 'कोविड-लॉकडाऊन' (टाळ्या-थाळ्या वाजवण्याचा अगोचरपणा करुन 'अंधश्रद्धे'च्या अंधारयुगात मात्र, देश ढकलला).... म्हणजे, 'हिंदुत्व' तर, नव्हेच; उलट, 'हिंदुत्वा'ची क्रूर थट्टाच होय!


सगळ्या दमनकारी सरकारी-यंत्रणा (ईडी, सीबीआय, केंद्रिय सुरक्षादले व इतर पोलिस-निमलष्करीदले इ.) आपल्या घृणास्पद राजकीय हेतूपूर्तिसाठी बेमुर्वतखोर व बेगुमानपणे वापरुन लोकशाहीचा मुडदा पाडणं... न्याययंत्रणा, पत्रकारितेसारखे लोकशाहीचे आधारस्तंभच खिळखिळे करणं, 'कॅग'चा (संदर्भ: विनोद राय यांचा माफीनामा)बदमाषीपूर्णवापरकरणं,....म्हणजेतर, 'हिंदुत्व'नव्हेच नव्हे; कारण, जाज्वल्य 'हिंदुत्व' 'व्यक्तिस्वातंत्र्या'ला व सर्वंकष समाजकल्याणाला अतिशय पवित्र व शिरोधार्य मानतं!

बेरोजगारी, उपासमार, वाढता बकालपणा आणि प्रदुषण... या जनतेच्या मूलभूत प्रश्नांवरचं लक्ष दूर उडवून लावण्यासाठी जातधर्माची तेढ वाढवण्याचा अघोरी उपाय योजायचा.... हे म्हणजे, 'हिंदुत्व' नव्हेच!

**तुम्हाला हिंदुत्वाचा अभिमान बाळगायचा असेल; तर, जरुर बाळगा.... पण, हिंदुत्वाच्या नावावर शोषण करणाऱ्यांना, ठगवणाऱ्यांना, लुटणाऱ्यांना, फसवणाऱ्यांना, गंडवणाऱ्यांना निवडणुकीत चांगलाच धडा शिकवा!!!**

.... ***राजन राजे*** (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)


Rajan Raje - राजन राजे ... · 27s
अवतार 'विष्णु'चा की, अवतार 'हिरण्यकश्यपु'चा... याची काळ अचूक-अमिट नोंद ठेवेलच! कारण, नियती ना लाच (किंवा, सध्याच्या भाषेत 'खोके') स्विकारत नाही...ना तिच्यापुढे ईडी, सीबीआय, आयटीची प्रज्ञा चालत...'रामलल्ला' या लडीवाळ नावातच, 'राम आहे अन् अल्ला' देखील... सर्वधर्मसमभावाचं उत्तम दर्शन!


Rajan Raje - राजन राजे ... · 2m
शंकराचार्य नाहीत, पौष महिन्यात शुभकार्य करत नाहीत व एप्रिलमधेच रामनवमीचा चपखल मुहूर्त असूनदेखील अयोध्येतल्या राममंदिर उद्घाटनाचा मुहूर्त, हिंदूधर्मशास्त्रविरोधी असा २०२४च्या लोकसभा-निवडणुकीपूर्वीचाच धरणं; म्हणजेच, भाजपाच्या बोगस-बेगडी हिंदुत्वाचं रहस्योद्घाटन होणं!
@RahulGandhi

# गांधी समजून घेताना...

**सोशल मीडियावरच्या ग्रुपमधील, एका १८–२० वर्षांच्या परिचित कोवळ्या तरुणानं, वैयक्तिक मेसेज करुन प्रश्न विचारला, शाळेत असताना २६ जानेवारी/१५ ऑगस्टला, नेहरु–गांधी–सरदार–सुभाष–टागोर–इंदिरा यांची वेशभूषा करुन, आम्ही स्पर्धेत भाग घ्यायचो; पण, कधीच कुणी हेडगेवार–गोळवलकर–गोडसे आजही का होत नाही?**

तरुणांच्या शंका मी कधीच टाळत नाही; कारण, त्यांच्यामुळे अनेकदा स्फुर्ती मिळते, ज्ञानात भरच पडते. हा लेख याच भावनेतून लिहिला गेलाय...

स्वातंत्र्य मिळण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया, तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान टलींनी तेथील संसदेत INDIA INDEPENDENCE ACT-1947 मंजूर केल्यानंतर सुरु झाली. २६ जानेवारी–१९५० रोजी, हा कायदा संपुष्टात येऊन 'भारत नावाचं संघराज्य' जगाच्या नकाशावर आले... परंतु, तत्पूर्वीच ही सर्व प्रदिर्घ प्रक्रिया सुरु असतानाच; बहुसंख्य, म्हणजे सुमारे ५५० संस्थानिक राजा–महाराजांनी स्वतंत्र भारतात सामील होण्यास नकार देत, ब्रिटीशांनी जसा देश आमच्या ताब्यातून घेतला होता, तसाच तो आमच्याकडे सोपवा, अशी मागणी करायला सुरुवात केली.

१७५७च्या प्लासीच्या लढाईतील ब्रिटिशांचा विजय ते १८१८पर्यंत पेशवाई बुडवेपर्यंत, बहुतेक संस्थानिकांनी इंग्रजांसमोर नांगी टाकून त्यांच्याकडून तनखे आणि तैनाती फौज स्विकारुन ब्रिटिशांशी जमवून घेतले.(अपवाद फक्त, टिपू सुलतान आणि यशवंतराव होळकर)

या संस्थानिकांना, त्यांच्याच राज्यातील दरिद्री आणि निरक्षर जनतेशी काहीही देणे–घेणे नव्हते. त्यांना काळजी होती ती, आपली सरंजामशाही स्वातंत्र्यानंतर कायमची जाण्याची. **स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, पहिल्या तीन वर्षांतच पं. नेहरुंच्या नेतृत्त्वाखाली, त्यांचे ज्येष्ठ सहकारी सरदार पटेलांनी खंबीरपणे या संस्थानिकांचा माज उतरवून त्यांना स्वतंत्र भारतात सामील होण्यास भाग पाडले.** 'The story of accession of states' by V. P. Menon **या सरदारांच्याच सचिवानं या पुस्तकात हे सर्व विस्तृतपणे मांडले आहे. पुढील काळात तर, इंदिरा गांधींनी पंतप्रधान झाल्यानंतर, त्यांचे तनखेदेखील बंद करुन, ऐशोआरामाला सोकावलेल्या या राजे–महाराजांचं अस्तित्वच संपुष्टात आणलं!**

मित्रांनो, गांधीचं महत्त्व लक्षात येऊ लागतं ते इथंच... म्हणजे, हा इतिहासाचा विस्तृत कॅनव्हास माहित करुन घेतल्यानंतरच. संस्थानिकांची ही, इंग्रजधार्जिणी मानसिकता आणि ब्रिटीश सत्तेकडून होत असलेले भारतीय जनतेचे सततचे सर्वांगीण शोषण, इंग्रजी शिक्षण–पद्धतीमध्ये साक्षर झालेले बाबू, यामुळे ब्रिटिश सरकार मजबूत होत होते; तर, दुसरीकडे हिंदी जनता मात्र, दिवसेंदिवस भुकेली आणि कंगाल होत चालली होती. (दादाभाई नौरोजींनी मांडणी केलेल्या Drain Theoryमध्ये नेमके हेच वर्णन केलेले आहे. त्यानंतर सुमारे २०–२५ वर्षांनी गांधींच्या हाती स्वातंत्र्यलढ्याचं नेतृत्व आल्यानंतर तर, ही परिस्थिती आणखीनच बिघडत चालली होती, असो)...

आता, या स्थितीत स्वातंत्र्य चळवळीला एका विशिष्ट मुल्यांची जोड दिली पाहिजे, हे सर्वप्रथम ओळखले ते गांधींनीच. चळवळीत येण्याआधीच,१३ एप्रिल–१९१९च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर बळी गेली ती, निरपराध सर्वसामान्य गोरगरीब जनताच, हे गांधींनी उघड्या मन:चक्षूंनी पाहिलं होतं... अंतर्मनानं जाणून घेतलं होतं. सारा देश तर, पुरता हादरुनच गेला!

इंग्रजांचं साम्राज्य अवाढव्य, प्रचंड लष्करी ताकद आणि सैन्य, अत्याधुनिक शस्त्रास्त्र व दारुगोळ्यांनी सज्ज. ब्रिटिश सरकारला हिंसक पद्धतीने विरोध केला तर, काय होऊ शकते, हेच या हत्याकांडाने इंग्रजांनी सिद्ध केले. गांधींनी सर्वप्रथम हे वास्तव जाणून घेतलं. इथं, क्रातिकारकांच्या कार्याचं मोल



अजिबात कमी होत नाही; पण, त्याला वास्तवात खूप मर्यादा होत्या. सर्वसामान्य लोक चळवळीपासून कोसो दूर असताना, आपण केवळ काही क्रांतिकारकांनाच सुळावर चढताना पहात बसायचे?

लोकमान्य टिळकांनंतर, ऑगस्ट–१९२०मध्ये, स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधींकडे आले आणि त्यांनी ही चळवळ सर्वसमावेशक बनवायला सुरुवात केली, ती त्यामुळेच. सरंजामशाहीच्या (Feudalism) मानसिकतेतून जनतेला बाहेर काढण्यासाठी, त्यांनी अहिंसेबरोबरच सविनय कायदेभंग, असहकार, स्वदेशी शिक्षण या आयुधांचा कल्पकतेने वापर केला. तो केला नसता तर, हिंसेच्या मार्गात असंख्य गोरगरीब, अशिक्षित, शोषित ब्रिटिशांकडून हकनाक मारले गेले असते.

**गांधींचा मीठाचा सत्याग्रह तर, भल्याभल्यांना समजलाच नाही. दुष्काळात सरकारने मिठावर कर वाढविल्याच्या निषेधार्थ, त्यांनी साबरमती ते दांडी अशी अवघ्या ८० सहकाऱ्यांसोबत काढलेली ३०० कि.मी. ची दांडीयात्रा स्वातंत्र्यलढ्यासाठी** Game Changer **ठरली. गदिमांच्या भाषेत सांगायचं झालं तर, 'उचललेस तू मीठ मूठभर, साम्राज्याचा खचला पाया' असा हा या यात्रेचा महिमा!**

मूठभर क्रांतिकारकांनीच आहुती देण्यापेक्षा, सर्वसामान्यांनीच आता लढ्यात उतरावे, हा गांधींचा उलटा प्रवास!

(आज राहुलचं राजकारणही गांधींच्याच मार्गावरुन पुढे जाणारं आहे... आजच्या रुढ राजकारणाच्या पूर्णत: विरुद्ध! असो, आजच्या लेखाचा तो विषय नाही.)

आजच्या भाषेत गांधींकडे ना दिलखेचक व्यक्तिमत्व होतं, ना भुरळ पाडणारी भाषा. परंतु, तरीही जनतेनं गांधींचाच मार्ग स्वीकारला आणि पुढे त्याचीच जनचळवळ झाली, तिने त्याच मार्गाने पुढील प्रवास करत स्वातंत्र्यप्राप्तीचं ध्येयही गाठलं.

स्वातंत्र्यलढ्याची चळवळ अशी सर्वसमावेशक होत असतानाच, तिला समानतेच्या मूल्याचं परिमाण, गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने दिलं. त्यासाठी स्थानिक नेतृत्वाला प्रोत्साहन देत चळवळीची धार वाढवत नेली. परंतु, तिला कधीही अहिंसेच्या मार्गापासून भरकटू दिले नाही.(अपवाद फक्त १९२२च्या चौरीचौरा येथील पोलीस चौकीला आग लावून, पोलीसांना जिवंत जाळण्याच्या घटनेचा. पण, या हिंसक घटनेनंतर, गांधींनी चळवळ तात्काळ थांबवली. अनेकजण त्यामुळे नाराजही झाले, तरी गांधींनी पर्वा न करता, पुन्हा जनतेला अहिंसेच्याच मार्गावर आणले.)

**स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाहीमार्गाने, धर्मनिरपेक्षतेवर आधारित जनतेचं राज्य येणार आणि त्यात संस्थानिक, त्यांचे हुजरे यांना काहीही स्थान नसणार, हे स्पष्टच झाल्यावर याच मंडळींनी कोल्हेकुई करत गांधींना विरोध सुरु केला.**

मध्ययुगीन सरंजामशाही आणि ब्राह्मणशाही यांना झुगारुन देत, दलित–सवर्ण, गरीब–श्रीमंत, महिला–पुरुष अशी समाजातील विभिन्न स्तरांची मोट बांधून काँग्रेसने स्वातंत्र्यलढा उभारला. **युरोपातील प्रबोधनकाळ, उदारमतवाद, फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांतींनी दिलेली मूल्यं स्वीकारत, स्वत:च्या मूल्यांची त्यात भर टाकून, जगाला प्रेम–अहिंसा–शांती–मानवतेचा संदेश देणारा ऐतिहासिक स्वातंत्र्यलढा उभारला तो गांधींच्या काँग्रेसनंच. नेमकं हेच काहींना नको होतं, त्यांना हवा होता, तो ब्रिटिश पूर्वकालीन, मध्ययुगीन हिंदुस्थान... जिथं केवळ ठराविक वर्गाचंच वर्चस्व असणार होतं. गांधींना विरोध होऊ लागला, तो याच वर्चस्ववादी मानसिकतेतून.** RSS **आणि हिंदू महासभेची स्थापना झाली, ती हीच मानसिकता बळकट करण्यासाठी!**

**१९३४ सालीच गांधींच्या हत्येचा पहिला प्रयत्न होत असताना, दुसरीकडे दोनच वर्षांनी सावरकरांनी, द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला, हा काय निव्वळ योगायोग होता काय? गांधी–हत्येसाठी पिस्तूल कुणी पुरवलं? कोणत्या संस्थानिकांनी पडद्याआड मदत केली? स्वतंत्र भारतात सामील होऊ नका म्हणून, संस्थानिकांना पत्रं लिहिली कुणी? अल्वरच्या संस्थानिकानं तर, गांधींचे तुकडे करुन ते कुत्र्यांना खायला घाला, अशी प्रक्षोभक भाषेतील छापील पत्रकंच जाहीरपणे वाटली होती.**

पाकिस्तानसाठी ५५ कोटींची तरतूद ही, ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केलेल्या कायद्यानुसार होती आणि नेहरुंच्या तत्कालीन मंत्रीमंडळाने ती मंजूर करताना, जनसंघाचे डॉ. शामाप्रसाद मुखर्जीही होतेच. त्यांनी याला विरोध केल्याची नोंद नाही.

मुद्दा हा की, धर्मनिरपेक्ष भारतीय प्रजासत्ताकाची स्थापनाच धडपणे होऊ नये म्हणून RSS, जनसंघ,...(पान १५ वर)

## गांधी समजून घेताना...... .

..(पान क्र. १४ वरुन)

हिंदू महासभा अस्वस्थ होऊन अप्रत्यक्षपणे जीनांनाच पूरक कार्य करीत होती आणि त्यासाठी हवा तितका रक्तपात करायचीही त्यांची तयारी होती... हे सर्व हिंदुराष्ट्राच्या नावाखाली चालले होते.

या सर्वांची परिणती अशी झाली की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरदेखील, सुमारे दहा वर्षे भारतात कुठे ना कुठे धार्मिक दंगली-हिंसा चालूच होत्या. अनेकदा वृत्तपत्रात तशा बातम्याही येत असल्याचे माझी आजी मला लहानपणी नेहमी सांगत असे. यावरुन, फाळणीची जखम ही, प्रदीर्घकाळ कशी भळभळत राहिली होती, हे वाचकांच्या लक्षात आलंच असेल.

**माझे पणजोबा हे, भारत-छोडो आंदोलनात ब्रिटिश सार्जंटच्या (आजचा इन्स्पेक्टर) सोट्याचा फटका डोक्यावर बसल्यामुळे, रक्तबंबाळ अवस्थेतच गायब झाले व खोट्या नावाने उपचार घेऊन थोडे बरे झाल्यावरच घरी परतल्याचे आजी सांगे. वाचनाची आवड असल्याने, सर्वप्रकारची अद्ययावत माहिती तिच्याकडे मरेपर्यंत असायची. त्यामुळे आम्हाला बऱ्याच गोष्टींची माहिती आपसूकच व्हायची.**

**गांधीहत्येच्या कटात सावरकरांना सुरुवातीला अटक झाली होती. परंतु, पुराव्याभावी त्यांची नंतर सुटका झाली तरीही, समाजाने त्यांच्यावर बहिष्कारच टाकला होता. नंतरही त्यांनी समाजासाठी कोणतेही भरीव कार्य केले नाही, असे माझे वडीलही सांगत.**

खरोखरच, आमच्या पिढीपेक्षा आमच्या पूर्वजांना खूप तारतम्य आणि व्यावहारिक समज चांगलीच होती. कुठल्याही भुलथापांना आणि प्रोपोगंड्याला ते बळी पडले नाहीत. त्यांच्यामुळेच हा देश स्थिरस्थावर झाला आणि अवघ्या काही वर्षांतच प्रगतीच्या दिशेने वेगाने झेपावला.... असो.

**गांधी-नेहरु-पटेल हे तिघेही हिंदू असूनही त्यांनी अपरिहार्यपणे फाळणीचे वास्तव स्वीकारले. तसेच ते बहुसंख्य भारतीय नागरिकांनीही. 'सरफरोश' या चित्रपटाच्या शेवटी आमिर खानने हे वास्तव अतिशय परखडपणे मांडले आहे.**

**हिंदूराष्ट्र निर्मितीच्या आवेगाने झपाटलेल्यांनी गांधींऐवजी, निजाम/नबाब किंवा काश्मीरच्या विलिनीकरणाला सुरुवातीला ठाम नकार देणाऱ्या महाराजा हरीसिंह किंवा मग खुद्द बॅ. जीनांवरच कधी गोळी का नाही झाडली...???**

या आणि वरील सर्वच प्रश्नांची उत्तरे शोधली तर, गांधीहत्येचे पैलू स्पष्ट होत जातात... आणि, त्यामागील पद्धतशीर नियोजनही. जर गांधी पाकधार्जिणे होते; तर, गांधीहत्येचं तुमचं समर्थन इतिहासानं आणि जगानं आपसूकच मान्य केलं असतं. पण, आज ७५ वर्षांनीदेखील तसं झालेलं नाही. तिकडे अमेरिकेत जाऊन गांधींच्या पुतळ्याचे अनावरण करणारे, नथुरामला जाहीरपणे आणि अभिमानाने का स्वीकारत नाहीत?

**बराक ओबामा भारतात येऊन, आपल्याच संसदेत, गांधी आणि बाबासाहेबांची महती आपल्यालाच ऐकवतात, तेव्हा शरमिंदे होण्याशिवाय आपल्याकडे पर्यायच नसतो. स्वतःच्या व्यक्तिमत्वावर गांधीची छाप असल्याची जाहीर कबूलीही ते देतात आणि भारताच्या Success Storyचं श्रेय सुद्धा दिलखुलासपणे या दोघांना देतात.**

मग, मित्रांनो तुम्हीच सांगा... स्वातंत्र्यदिन किंवा प्रजासत्ताक दिनाच्या ऐतिहासिक दिवशी, याच मंडळींची वेशभूषा करुन, त्यांनी दिलेल्या वारशाची आठवण नाही करायची, तर मग कुणाच्या वारशाची आठवण करायची?

पं. नेहरुंनी भारतमातेची केलेली व्याख्या मला नेहमीच पटते... **नेहरु नेहमी म्हणायचे, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेला हा विस्तीर्ण भूभाग म्हणजे भारतमाता नव्हे; तर, ही ३५ कोटी जनता म्हणजेच भारतमाता. या जनतेची, दारिद्र्य, रोगराई, दुष्काळ, निरक्षरता यापासून मुक्तता करणे; म्हणजेच, भारतमातेची सेवा नेहरु पुढे असंही कबूल करत की, ही भारतमाता माझ्या भाषणाला लाखोंनी येते पण, जयजयकार मात्र, गांधींच्याच नावाने करते!.**

**आज, ही भारतमाता १४० कोटींची झाली; तरी, आजही गांधी तुम्हाला तिच्यातच पहायला मिळतील...!!!**

*...रुद्रेश सातपुते*

---

राहुल सोलापूरकरसारखा लोचट आणि खोटारडा माणूस भारतात दुसरा नसेल ... जी गोष्ट खुद्द मोदी-योगींना माहित नाही ती खोटी गोष्ट राहुल सोलापूरकर सगळ्या गावाला सांगत सुटला आहे आणि त्याच्या समोरची हजारोंची गर्दी मुर्खासारखी टाळ्या वाजवत आहे!

सोलापूरकर सांगतात की, कोरोनाच्या लॉकडाऊनमध्ये २५ मार्च-२०२० रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी मोदींनी समस्त देशाला सकाळी ८:३० ते ९:३० या काळात घरात दिवे लावून थाळी वाजवायला सांगितले... आणि म्हणे हे मोदींनी मुद्दाम घडवून आणले; कारण, त्याचवेळी अयोध्येत योगींनी श्रीरामाची मूर्ती जन्मस्थानाकडून अस्थायी मंदिराकडे स्वतःच्या डोक्यावर नेली, जेणेकरून जन्मस्थानी मंदिराचे काम सुरू करता येईल! योगींना त्यावेळी उत्सव व्हावा असे वाटत होते; पण, कोरोनाने ते शक्य नव्हते म्हणून मोदींनी ही शक्कल काढली ... आणि हे फक्त राहुल सोलापूरकरना माहित आहे.

ओ सोलापूरकर... सगळ्यात महत्वाचे म्हणजे, मोदींनी २५ मार्च रोजी नाही, तर २२ मार्चला थाळी वाजवायला सांगितली होती... तीसुद्धा सकाळी ८:३० ते ९:३० अशी तासभर नाही, तर संध्याकाळी ५ वाजता फक्त ५ मिनिटांसाठी! आणि जेव्हा २२ मार्च रोजी संध्याकाळी ५ वाजता हा थाळी वाजवण्याचा कार्यक्रम झाला तेव्हा योगी स्वतः गोरखपूरमध्ये मंदिरात घंटा वाजवत होते, हे असंख्य बातम्यात दिसते!

सोलापूरकर, इतकेही फेकू नका की, शेठजींना कॉम्प्लेक्स यावा...

**- डॉ. विनय काटे**

---

''कोण कोणासोबत जाईल, हे सांगणं खूप कठीण आहे'', या बहेनजींच्या उद्गारानंतरचा 'मायावती इफेक्ट', काय चमत्काराची 'राजकीय-नौटंकी' घडवू शकतो; ते जरा पहाच...

'स्वप्नात हत्ती दिसणं', हे सर्वसाधारणपणे भारतीय जनमानसात ऐश्वर्यसंपन्नता-सत्तावैभव, याचं निदर्शक मानलं जातं. मात्र, वरील 'मायावी' उद्गारांमुळे, 'बसपा'चा 'हत्ती' मोदी-शहांच्या स्वप्नात येऊ लागलाय... मात्र, तो आलाय, २०२४ च्या लोकसभा-निवडणुकीसंदर्भात सत्तावैभवाच्या शकुनाऐवजी, एक अपशकून बनूनच!

...तिथून पुढे घडलेला, ताजा घटनाक्रम पाहिला की, एखाद्या सुजाण-सज्जन भारतीय नागरिकाच्या मनात-अंतःकरणात एकतर संतापाची तिडीक जावी किंवा त्याच्यावर, स्वतःच्याच कपाळावर हात मारुन घेण्याची वेळ यावी.

**तो घटनाक्रम असा,**

**मोदी-शहांविषयी भयंकर अपशब्द उच्चारणाऱ्या उ. प्रदेशच्या 'ओमप्रकाश राजभर' आणि रामाविषयी अश्लाघ्य भाषेत सतत गरळ ओकणाऱ्या 'संजय निषादां'पुढे भाजपाच्या 'गुजराथी-लॉबी'ने सपशेल गुडघे टेकलेत.**

**अयोध्या आंतरराष्ट्रीय-विमानतळाला नाव रामाचं नव्हे, सीतेचंही नव्हे आणि कर्नाटक-विधानसभा निवडणुकीत, ज्याच्या नावाचा बेकायदेशीररित्या निवडणूक-प्रचारात मोदींतर्फे सर्रास गैरवापर करण्यात आला होता, त्या 'बजरंगबली हनुमाना'चंही नव्हे... तर, महर्षी 'वाल्मिकी'चं (उ. प्रदेशात जवळपास दिडदोन कोटींच्या आसपास वाल्मिकी-समाज आहे म्हणूनच) ठेवण्यात आलंय.**

**'दिल्ली ते अयोध्या' पहिल्या विमान-उड्डाणात, 'भगव्या' दुपट्ट्यात 'हनुमान-चालिसा'चं पठण चालू होतं... तर, साधारण त्याचवेळेस पं. नरेंद्र मोदीचं उ. प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ स्वागत करत होते; तेव्हा, मोदीजी 'भगव्या' ऐवजी चक्क 'निळा पट्टा' गळ्यात मिरवत होते आणि तद्नंतर, पंतप्रधान कुठे चहापान करायला खास गेले... तर ते, अतिदलित निषाद परिवाराच्या धनीराम मांझी यांच्याकडे!**

**भारतीय-राजकारणाला पडलेला विखारी जातधर्मीय विळखा सुटणार कधि आणि ही प्रच्छन्न 'राजकीय-नौटंकी' व त्या नौटंकीच्या पडद्याआडून, सुरु असलेलं सर्वसामान्य जनतेचं अपरिमित शोषण-दमन व अन्याय-अत्याचारांची मालिका, थांबणार तरी कधि...???**

***.... राजन राजे*** (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)

## मी मोहनदास गांधी!

*माझ्यासाठी प्रतिवाद करण्यात*
*वेळ फुकट घालवू नका,*
*गोडसेला मी केलंय माफ,*
*माझे वकील बनू नका...*

*असेल आदर माझ्यासाठी,*
*तर एक करायला विसरू नका.*
*तुमच्याही काळजात आहे देव,*
*त्याचा आवाज दाबू नका...*

*रहायचे असेल खरे जिवंत,*
*तर प्रश्न करणे थांबवू नका.*
*मी देखील चुकलो आहे,*
*मला शंभर टक्के मानू नका...*

*रोजच्या पुरते निसर्ग निर्मिती,*
*साठ्याचा हव्यास करू नका.*
*सर्वोदयावर असेल विश्वास तर*
*भंग्याहून श्रेष्ठ समजू नका...*

*विज्ञानाच्या नाही विरोधी,*
*श्रमचोरीचे तंत्रज्ञान बनवू नका*
*विश्वस्ताची भूमिका घेऊन*
*मिळकत जादा कमवू नका...*

*वकिली सोडून मी बनलो विणकर,*
*हे सोयिस्करपणे विसरू नका.*
*वागणार नसाल असे तुम्ही तर,*
*गोडसेहून वेगळे समजू नका!*

**– डॉ. रुपेश पाटकर**

रावणाने निदान एकट्या सीतेचंच अपहरण केलं होतं; पण, आधुनिक रावणांनी 'लोकशाही'रुपी सीतेसह, अयोध्येतल्या 'रामा'चंही अपहरण केलंय... 'प्रजासत्ताक' ते 'मोदीसत्ताक', या देशाच्या अवनत प्रवासाचा, हा परिपाक आहे!

हा भारत देश, 'भाजप-रा.स्व.संघराज्य' नसून घटनादत्त 'लोकशाही-प्रजासत्ताक संघराज्य' आहे, ही वस्तुस्थिती पुन्हा एकवार प्रस्थापित करण्यासाठी... मंदिर-मस्जिद नव्हे; तर, पोटापाण्याच्या प्रश्नांसाठी, न्यायनीतिसाठी, आपल्या लोकशाही-हक्कांसाठी आणि 'सत्यमेव जयते' हे भारतीय-अध्यात्माचं व भारतीय-प्रजासत्ताकाचं ब्रीद चिरायू ठरण्यासाठी जागरुकतेनं मतदान करायला हवं... त्यादृष्टीनेच, वर्ष-२०२५ मध्ये प्रजासत्ताकाची पंच्याहत्तरी, प्रजासत्ताकाचा 'अमृतमहोत्सव' साजरा करण्याची संधि, भाजपा-सरकारला मिळताच कामा नये; असा, आपल्यापैकी प्रत्येक जाणकार मतदार-नागरिकाने मनोमन निर्धार केला पाहीजे...!!!

मतदार-राजा जागा रहा...२०२४च्या लोकसभा-निवडणुकीचं घोडामैदान जवळ आहे!

...यासोबतच, जरा वेळ काढून वाचूया (विशेषतः, महिलावर्गाने जरुर वाचावाच असा), आनंद शितोळेंचा खालील संदेश....

# 'मुलखावेगळ्या राजा'चे संविधान...

**गांधीजींच्या विचारांनी प्रेरित झालेल्या एका राजाने आपल्या संस्थानात नवे संविधान लागू केले ... हा प्रयोग अविश्वसनीय आणि लक्षवेधी होता .**

**संविधानभान**

**स्वतंत्र होऊ** पाहणाऱ्या भारताच्या संविधानासाठी तेव्हा मांडले जात असलेले वेगवेगळे मसुदे लिखित स्वरूपांत उपलब्ध आहेत. मात्र नव्या संविधानासाठीचे प्रयत्न केवळ पुस्तकी नव्हते. काही ठिकाणी प्रत्यक्ष संविधान लागू करण्याचे प्रयोग झाले.

ब्रिटिश काळात भारत दोन भागांत विभागला होताः ब्रिटिश भारत आणि संस्थाने. अनेक संस्थानांमध्ये राजेशाही होती. काही संस्थानांमध्ये वेगळे प्रयोग झाले. त्यापैकीच एक औंधचे. इतर संस्थानांच्या तुलनेत ते छोटे म्हणजे ७२ खेड्यांचे होते. ही खेडी सलग नव्हती. ती सांगली, सातारा, सोलापूर आणि विजापूर जिल्ह्यात विभागलेली होती. कऱ्हाडला असलेली गादी इंग्रजांच्या ताब्यामुळे औंधला गेली.

या संस्थानाचे शेवटचे राजे होते भवानराव पंतप्रतिनिधी. ते महात्मा गांधींच्या विचारांनी भारावलेले होते. स्वयंपूर्ण खेडे आणि स्वराज्य या कल्पना प्रत्यक्षात आणल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. लोकांची सत्ता स्थापित करायची तर आपण गांधींचा सल्ला घेतला पाहिजे असा सल्ला मॉरिस फ्रीडमन यांनी त्यांना दिला. फ्रीडमन हे भवानरावांचे पुत्र आप्पासाहेब यांचे मित्र. फ्रीडमन यांच्या सल्ल्यानुसार भवानरावांनी वर्ध्यामध्ये गांधींची भेट घेतली. स्वराज्य या विचाराविषयी चर्चा झाली. त्यानुसार १९३८ साली भवानराव पंतप्रतिनिधींनी सत्तेचा त्याग केला आणि लोकांची सत्ता स्थापन करण्याची घोषणा केली. २१ जानेवारी १९३९ रोजी त्यांनी औंध संस्थानाचे नवे संविधान लागू केले.

भवानराव आधीपासूनच स्वातंत्र्य चळवळीशी जोडलेले असल्याने राजासारखे जगणे त्यांना नामंजूर होते. त्यामुळेच १९१७ पासून त्यांनी औंध संस्थानांमधील गावांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केली होती. औंधचे संविधान लागू झाल्यावर फ्रीडमन यांनी गावोगावी जाऊन लोकांसाठी कार्यालये स्थापन केली. स्वतंत्रतापूर येथे मुक्त तुरुंग स्थापन केला. आरोपींना मुक्त तुरुंगात राहून स्वसंयमाने स्वतःत बदल घडवून आणणे त्यांना अपेक्षित होते. या नव्या संविधानानुसार सर्व लोकांना मतदानाचा हक्क देण्यात आला मात्र साक्षर लोकांना मतदानाचा हक्क देण्यात यावा असे गांधींनी 'हरिजन'मध्ये लिहिले. त्यामुळे भवानरावांनी औंध संस्थानातील निरक्षरता कमी करण्यासाठी २० हून अधिक शाळांची स्थापना केली. संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण समान व मोफत असेल, अशी तरतूद केली. पंचायत राज व्यवस्थेचा अनोखा प्रयोग या संस्थानात सुरू झाला. ग्रामस्वराज्य आणि सामाजिक एकता यांवर आधारलेले संविधान लागू झाले. संस्थानात निवडणुका झाल्या आणि आप्पा पंत हे नवे पंतप्रधान झाले. पुढे १९४३ मध्ये रामाप्पा बिद्री पंतप्रधान झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर औंध संस्थान स्वतंत्र भारतात सामील झाले. छोटे संस्थान असले तरी त्यांनी राबवलेला प्रयोग अनोखा होता म्हणूनच पं. नेहरू हा प्रयोग पाहण्यासाठी औंध संस्थानात आले होते. शिवाय 'चले जाव' चळवळ आणि प्रतिसरकार स्थापना यामध्ये सक्रिय असणाऱ्या क्रांतिकाऱ्यांना या संस्थानाची मदत झाली होती.

इंदिरा रॉदरमंड यांनी 'औंध एक्सपरिमेंट' नावाचे पुस्तक लिहीत गांधीवादी संविधान तळागाळापासून लोकशाही स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. आप्पा पंतांनी तर 'मुलुखावेगळा राजा' असे पुस्तकच भवानराव पंतप्रतिनिधींविषयी लिहिले. भवानराव हे अनेक अर्थांनी मुलुखावेगळे होते. सर्वांना योगा, सूर्यनमस्कार करायला लावून शारीरिक आरोग्य तंदुरुस्त ठेवायला सांगणारे बहुआयामी भवानराव १९३५ साली झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षही होते. येनकेनप्रकारेण सत्ताप्राप्तीचे प्रयत्न होतानाच्या काळात, सत्तेचा त्याग करत गांधीवादी संविधान राबवण्याचा भवानरावांचा प्रयत्न आजही अविश्वसनीय वाटावा असाच, मात्र नवा मार्ग दाखवू शकेल इतका लक्षवेधी आहे!

**– डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

शिवछत्रपतींच्या महाराष्ट्रात असाही एक रयतेचा जाणता राजा होऊन गेला, ज्यानं कुठल्याही बाह्य दबावाविना स्वयंप्रेरणेनं, म. गांधींच्या प्रेरणेनं, त्यांच्या शिकवणुकीवर आधारित २१ जानेवारी –१९३९ रोजी 'आदर्श राज्यघटना' (संविधान) आपल्या राज्यात आणली आणि त्यानुसार, आपल्या छोटेखानी राज्यात 'पंचायत-राज्यव्यवस्था' निर्माण केली. भारतात 'पंचायत राज्यव्यवस्था' औपचारिकरित्या येण्यासाठी १९९२ साल उजाडावं लागलं आणि ७३ वी घटनादुरुस्तीचं सव्यापसव्य पार पाडावं लागलं, या पार्श्वभूमीवर तर ही बाब, लोकविलक्षणच मानावी लागेल....राजे-महाराजे, सगळेच जर कधि, असे निपजले असते तर...???.

... ***राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)




मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित
'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'
या कामगार संघटनेत सामील व्हा !!!

राजन राजे
(अध्यक्ष)







महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)